नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

एप्रिल—मे, १९७०

अनुक्रमणिका

साभार पोच

क्रमांक	पुस्तकांचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	मूल्य रुपये
१.	काळा सूर्य	अनिल दहिवाडकर	केदार प्रकाशन, केतकी ब्युटी पार्लर, माधवाश्रम हॉस्पिटल रोड, मिरज.	९३	१०।-
२.	फुलोर	श्रीकृष्ण काळे	वि. सा. संघ शाखा, जिल्हा दारव्हा.	६६	२।-
३.	प्रदेश साकल्याचा	मं. वि. सरदेशमुख	श्री विद्या प्रकाशन, २५० शनिवार, पुणे ३०	१८४	२५।-
४.	काही आंबट काही गोड	शकुंतला परांजपे	—,,—	१४१	१५।-
५.	व्हिएटनामचा संघर्ष	विजय कुवळेकर	—,,—	९६	१०।-
६.	आराध	मुक्तेश्वर	एम्. के. घोडके, एकता कार्यालय, २२१ शुक्रवारपेठ, तुळजापूर	१६८	१२।-
७.	अंतर्वेधी	मनोहर ओक	अशोक शहाणे ३९ नाथ माधव, कांदिवली पूर्व, मुंबई ६७	९२	१०।-
८.	दलित साहित्याचे निराळेपण	डॉ. प्रभाकर मांडे	धारा प्रकाशन, बन्सीलाल नगर, औरंगाबाद	१२८	१२।-
९.	जमात	म. वि. कोल्हटकर	—,,—	१०८	९।-
१०.	धर्मा	बाबा मांड	—,,—	७८	५।-

अनुक्रमणिका

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

१९७९
एप्रिल-मे १९७९
चैत्र-वैशाख, १९०१

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये) (वर्ष ३५, अंक १/२

संपादकीय

नव्या वर्षाचा हा शुभारंभी अंक वाचकांच्या हाती देतांना आम्हाला आनंद होत आहे. वैदर्भीय अस्मिता अभिव्यक्त करणारे वाङमय अधिक प्रमाणात देण्याचा आमचा सतत प्रयत्न आहे. नव्या वर्षाचा पुढील एक अंक "बालक वर्षानिमित्त" बालसाहित्यिकांच्या साहित्याला वाहिलेला असेल.

नव्या जाणीवा, नवे उन्मेष, नव्या सामाजिक जाणीवांचे व स्थित्यंतरांचे भान राखून साहित्यात साकार व्हावेत ही अपेक्षा धोरणभूत राखण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. आपले सहकार्य आजवर लाभले तसेच यापुढेही लाभावे हीच विनंती.

अंतरंग

अनुक्रमणिका

नियत / मुरलीधर कुळकर्णी

त्या दिवशी भगवान अचानक माझ्याकडे आला. बाहेर ऊन भराला आलेलं. मी ऑफिसात तगाईचे कागदपत्र उलथेपालथे करत होतो. भगवान आला नि सतरंजीच्या कोपऱ्यावर टेकला. डोक्यातली टोपी काढून तिनं वारं घेत उगा कागदांकडं बघत बसला. खरं तर त्याच्या मनात विचारांची खळबळ चाललेली दिसत होती. पण माझं काम होण्याची तो वाट पहात असावा. मग मीच समजुतीनं कागद एकत्र लावून बाजूला ठेवून दिले आणि डोळ्यां-वरला चष्मा काढून म्हटलं,

"हं बोला भगवानराव. उन्हाचा बराच लांबचा पल्ला मारलात." भगवानाच्या डोळ्याच्या पापण्या बराच वेळ खाली-वर झाल्या. गळ्याची घाटी एकदोनदा खाली-वर झाली नि त्याच्या डोळ्यात टचकन् पाणी उभं राहिलं. शेवटी गहिवरल्या सुरात तो म्हणाला,

"बघा सायेब, ह्याला का न्योव म्हणावं?"

"अरे, पण झालं तरी काय असं? इतकं रडकुंडीला येण्यासारखं असं घडलं काय?"

"तसं झालंय खरं सायेब. इचित्र. रामनाथ म्हणतोय वायलं निघायचंय".

"वेगळं? अरे, आठ दिवस झाले म्हणावं लग्न होऊन फक्त. हे कसलं वेड? वेगळे केव्हातरी निघणारच भाऊ-भाऊ, पण त्याला काही काळवेळ?"

"नियतच फिरत चाललीय सायेब जगाची, दुसरं काय! ह्या रामनाथ्यासाठी म्या काय केलं न्हाई? सारे लाड पुरवले. ल्हानपणापासून तळहातावरच्या फोडापरमान जपला. आईयगळं प्यार! म्हणलं तसं ऐकलं. आन आता हे आसं! त्याला शिकविलं. माह्यासाटी केलं न्हाई त्ये त्येच्यासाटी केलं. शिक्शान मधीच सोडूल तं म्हनलं सोड बावा. शिकला आस्ता तं मोठी चाकरी मिळाली आस्ती. पर म्हनला, आपलं डोस्कच चालत न्हाई. आपुन काय करायचं? काय ऐकलं न्हाई. म्हनलं हाक औतं. तं तेबी न्हाई! गुंडापुंडावरूबर पोळासारखा गावात हिंडला. जुगार मटका खेळला. खिशातले पैसे मला न पुसता घेऊ लागला. दोन्ही सांज ऐतं खात न्हायला. म्हनलं आईयगळं प्यार! दोन दीस करील. कव्हातरी डोळं उघडत्याल. पर न्हाई. प्यार हाताभायेर चाललं. म्हनलं लगीन करून धिल्लं की आपसुकंच यईल ठिकानावर. म्हनून लगीन केलं तं ह्ये आसं!" भगवानाच्या चेहऱ्यावर टेकीला आल्यासारखे भाव दिसत होते. मन मोडून गेल्यासारखा तो दिसत होता. चेहरा विचकल्यासारखा झाला होता.

माझा नि भगवानाचा तसा घरोबा वगैरे मुळीच नव्हता. मी त्याला विहीर आणि तालीसाठी तगाई मिळवून दिलेली होती. मी कसली मिळवून देणार? सरकारनं त्याच्या अर्जानुसार मंजूर केली होती. मी तलाठी मध्यस्थ फक्त. माझं कामच ते. पण भगवानाला माझ्याबद्दल काहीतरी वाटू लागलं. ह्यापूर्वीच्या तलाठ्यानं त्याचे अर्ज दाबून ठेवले होते. ती प्रकरणं मी निकालात काढली. शिवाय भगवानाला काही हातउसने पैसेही मी देत होतो. ते तो वायद्या-प्रमाणं वेळेवर आणून देत होता. आता मीही संसारी माणूस होतो. घरात पाचसहा खाती तोंडं. भगवानाला प्रत्येक वेळी याची आठवण करून द्यायचो. तोही कुटुंबवत्सल असल्यानं माझी नड जाणायचा. यापेक्षा मी भगवानासाठी अधिक काही केलेलं नव्हतं. पण कुणाचा, कुणावर केव्हा भाव बसेल काही नेम नाही.

भगवानानं मला अनेकदा चहाला बोलावलं होतं. मीही गेलेलो होतो. रामनाथविषयी तो नेहमी माझ्याजवळ तक्रार करायचा. मी म्हणायचो "भगवानराव, पोर आहे अजून. चालायचं केव्हातरी डोळे उघडतील. येईल ताळ्यावर." पण रामनाथचे पराक्रम ऐकल्यावर मीही मनातून

दचकत होतो. एकदा ज्वारी विकलेले तीनशे रुपये भगवानच्या खिशातून रामनाथनं चोरले. चोरीची कबुली दिल्यावर गुरकावून म्हणाला, "मंग, माही वाटनी न्हाई काय श्येतात? घेतले म्हून काय झालं?" पोराला शिंगं फुटलेली होतीं चांगलीच. मी भगवानाला दमानं घ्यायला सांगत होतो. शेवटी भगवान अगदी टेकीला आला. आणि त्याला कुणीतरी उपाय सुचवला, 'रामनाथ्याचं लगीन करून टाक. दोन दिसात सुतासारखा सरळ येईल.' आणि भगवाननं नेट धरला. लग्न जमवण्यासाठी मध्यस्थ तयार केले. त्यांच्यानं काम होईना म्हणून स्वतःच पोरींच्या बापांचे उंबरठे झिजवले. कोणी पोरगी द्यायला तयार होईना. शेतीवाडी थोडी. चौघं भाऊ. वाटण्या झाल्या तर एकेकाच्या वाट्याला चार-सहा बिघे जमीन आली असती. भगवानाच्या कमरेचा काटा ढिला झाला. रामनाथसारख्या गुंडाला पोरगी देऊन पोरीच्या संसाराचा खेळखंडोबा करायला कुठला बाप तयार होणार होता? पण कसाबसा भगवानचाच राजेवाडीचा सोयरा तयार झाला. हजार रुपये हुंडा आणि दहा मण गहू त्यानं मागितले. शिवाय पाच मण गूळ, तूप दोन डबे. मानापानाची लुगडी नि कपडालत्ता भगवानच्याच गळचात मारला. भगवानची परिस्थिती अगोदरच उसाच्या चोथाडा-सारखी. त्यानं एकरभर उसावर कर्ज काढायचं ठरविलं. सेक्रेटरीच्या सहाय्यानं को-ऑपरेटिव्ह बँकेचे झिजलेले जिने त्यानं आणखी गुळगुळीत करून टाकले. त्याकरता सेक्रेटरीची दाढी त्याला हज्जारदा धरावी लागली. कसेबसे हजारभर उभे राहिले. ऋण काढून हा सण त्याला साजरा करणं भाग होतं. मागामागी करून सोयऱ्याच्या पदरात गव्हा-गुळाचं माप टाकलं. लग्न जवळ आलं तशी भगवानाची पळापळ वाढली. इकडून तिकडून तो जोडीत होता. गाठी जमवलेले पैसे मोडत होता. लग्नाचं सामान घरात भरत होता. बस्ता बांधला तर नवरीच्या बापानं हट्ट घेतला. लग्नात पैठणी नि तोडे पाहिजेत. पैठणीची शालूवर समजूत निघाली. तोड्यांचं काय करायचं? भगवानानं भाड्यानं गुपचुप तोडे आणले. बस्त्यालाच पाचशे खर्च झाले. दोन बहिणींना लुगडी. दोघा भावांच्या बायकांना चोळीच्या खणांवर भागवलं. तेव्हा परीगा बसली रूसून.

"भगा, ह्ये बापाच्या घरचं शेवटलं कार्य. मला चांगला चीर हवा" "भगवानानं कपाळाला हात लावला. म्हणाला,

"आता बसा बोंबलत! परीगा तू आता चांगली कळति हायेस. नवऱ्याचा सौंसार चालवतीस तुला कळूने? माही परिस्थिती तं पघशील?" पण परीगा शाप ऐकेना. "मला चांगला पाऊणशेचा चीर मिळाल्यासिवा मी न्हाई येयाची लग्नाला." म्हणू लागली. भगवानला काय करावं सुचेना. शेवटी बायकोनं स्वतःच्या खुटबाळचा पुढं केल्या. भगवानाची बायको धोरणी होती. म्हणाली,

"माह्या खुटबाळचा मोडा. आना तिला चांगला चीर. उगा जगानं नावं ठिऊ नेत." भगवानाच्या डोळचापुढं काजवे चमकले. लग्नात बायकोच्या अंगावर फुटका मणी घालायला देखील माया नव्हती. सासऱ्यानं लग्नानंतर घातलेल्या खुटबाळचा. हात लावण्याच्या त्याला अधिकार नव्हता. "जास्ती इच्यार करूने. घ्या ह्या." त्यानं जड हातांनी बायकोच्या त्या खुटबाळचा मोडल्या. तेव्हा कुठं परीगाची हौस फिटली. लग्न जवळ आलं.

पहिला दिवस हळदीचा. तेव्हा नवरदेवच बसला रुसून. अंगाला हळद लावून घ्यायलाच तयार नाही. म्हणाला,

"भगवानदादा, सारं खरं, पर सोयऱ्याजवळ रेडू कबूल केलास का नाय? मला रेडू पाह्यजी!"

"हाये की आपला गरमपंच्यातीचा." भगवान हसून म्हणाला.

"माही चेष्टा करू नगस. सासऱ्याकडून रेडू घेतल्यावगर नवरदेव आजच्या काळात लग्नालाच हुबं ऱ्हात न्हाईत. मी न्हाई हुबा ऱ्हानार."

"बरं बरं. लई नगं ग्यान पाजयू. हाळद घी लावून. पुढं पघू." भगवान थोडा जरबेच्या आवाजात म्हणाला. रामनाथाला काय वाटलं, हळद लावून घेतली. आणि ऐन लग्नाच्या

वेळेला आपला इंगा दाखवला. शिरिमंती चढवायच्या वेळेला सोयऱ्यांना म्हणाला,

"सोयरं, रेडू आणून दिल्याबगर शिरिमंती चढवू द्यायचो न्हाई." म्हणून देवळात कोपऱ्यात जाऊन बसला. राजेवाडीकर सोयरा हवालदील झाला. भगवानजवळ येऊन म्हणाला,

"सोयरं, सोय पाहील त्यो सोयरा. म्या तुमाला रेडू कबूल केल्याला नव्हता. आपली बोली काय व्हती ?"

"खरं हाय सोयरं तुमचं. पर नवरदेवाचा हाट हाये. पुरवला पाह्यजे."

"माह्याजवळ काय पैक्याचं झाड हालतंय व्हय ? पडले आपले खळाखळा पैकं !"

"न्हाई परं—"

"सांगा तुमच्या भावाला रेडू फिडू काय न्हाई. ऐकत न्हाई म्हणजे काय ! आमच्या सोयऱ्यात आमची वेअब्रू नगं. भाव तुमचा त्यो. सांगा त्येला."

"भाव खरा पर हाट माहा न्हाई." भगवान म्हणाला. त्याच्या मनात हजार रुपयांचा खड्डा होता.

"तुमाला लगीन सुदामतीनं पार पडू द्याचं का न्हाई ?"

"तसं कसं ?"

"मंग जावा. समजूत काडा".

"कारं रामा, ऐकतोस का न्हाई ? माहीबी बेअब्रू करायचीय ? चार जनात त्वांड दावाया तरी ठू."

"मला रेडू पाह्यजीचं".

"आन्तो रेडू !" म्हणून भगवान उठला आणि गोठ्यात जाऊन टोणगा घेऊन आला.

"रामनाथा, ह्यो बघ रेडू". लोक हसू लागले. रामनाथ खजील होऊन शिरिमंतीला बसला.

"सोयरा अजापच दिसतोय". म्हणून पाहुणे म्हणू लागले. लग्न यथास्थित पार पडलं. जेवणं झाली. फळ भरलं. अहेर आले. नवऱ्या मुलाकडून दोनशेचा अहेर झाला. तेवढ्यात भगवानाचा खड्डा बुजणार नव्हता. तरी तेवढाच आधार.

रामनाथाला बायको मिळाली ती घरात उजवी. काळीसावळी पण नाकीडोळी नीटस. लोकांनी भगवानाला मानलं. भगवानाला अभिमान वाटला. केल्याचं चीज वाटलं. नवी नवरी येती जाती झाली. नवराबायको देवाला जाऊन आले.

रामनाथ बदलला. घुम्यासारखं वागू लागला. भगवानाशी बोलेना. हसून खेळून राहिना. सोळा दिवस रानात काम करायचं नसतं. गावातल्या टग्यांमध्ये फिरण्याची आयती संधी रामनाथला मिळाली. घरात मारक्या म्हशीसारखा कुऱ्यात वागू लागला. एक दिवस भाऊ भाऊ जेवत होते. रामनाथ मुकाटच. भगवान म्हणाला,

"आरं, रामनाथा, असा घुम्मावनी का रं ? बोलत का न्हाईस ? आमालाबी आवघडल्यागत व्हतंय". पाण्याचा तांब्या तोंडाला लावून रामनाथ घटाघटा पाणी पीत राहिला. पुन्हा घास तोंडात कोंबू लागला.

"ह्ये लक्शान काय ठीक दिसत न्हाई. आरं आसं गुळनी धरून कसं निभायचं ? तुह्या मनात काय हाये ?"

"मी सांगते भगादादा." परीगा भाकरीच्या टोपल्याजवळ बसलेली. म्हणाली, "त्येला वाटून पाह्यजे."

भगवानाच्या तोंडातला घास कडूकडू झाला. चर्या उतरली. ढसाढसा पाणी प्याला. कडू घास पोटात उतरला.

"कोरड्यास काह्याचं रं ह्ये ?"

"कारल्याचं न्हवं का !"

"तरी तं कडू लागतंय !" त्यानं विषयाला फाटा दिला. पण मन अस्वस्थच. मुक्यानं रामनाथ उठून गेला. भगवान मळ्यात. भगवान आणि जगूच्या बायकाही मळ्यात गेल्या. परीगा घरी राहिली.

संध्याकाळी दोघी जावा घरी आल्या. दळणाला गहू काढायला म्हणून भगवानची बायको उतरंडीशी गेली. भस्सदिशी मडक्यात तळापर्यंत हात. पायलीभर गहू तिनं लग्नातून वाचवलेले. अडल्यानडल्या वेळेला होतील म्हणून. पण

पायलीऐवजी तिठवाभर देखील उरले नव्हते. परीगा घरी राहिलेली म्हणून तिला विचारायला गेली,

"वईन्स, गाडग्यातले घवू काय झाले ?"

"मला काय ठावं ?" परीगानं कानावर हात ठेवले.

"तुमाला न्हाई तं कुनाला ठावं ? तुमी घरी व्हतात".

"मला काय राखनाला ठुलं व्हतं वहिनी ? काहीबी आपलं बोलावं."

"घरामंदी ध्यादिसा चोर शिरला का काय मंग ? त्येनं लुटले म्हणावं ?"

"मला म्हाईत न्हाई"

"मंग कुनाला म्हाईत ? त्या गाडग्याला तं चांगलं म्हाईत हे." दोघींची कुरकुर वाढत गेली. गल्लीभर पोचली. भगवानची बायको म्हणाली,

"चंडाळनी, तुला ल्हानाचं मोटं केलं ती चोऱ्या कराया ? तुह्यापायी मला नवऱ्याचा हज्जारदा मार सन करावं लागलाय. चट फेडशील सारं ! चांगला नवरा पघून लगीन करून धिलं आन् आता ह्ये धंदे सुचले ?"

"श्या देऊ नगंस वहिनी. म्या काय चोरी केल्याली न्हाई."

"चोरी न्हाई शिंदळकी केलीस. त्या रामनाथ्यालाबी पढविलंस त्याला वायलं काढायचा डाव तुह्राच चंडाळनी".

"श्या देऊ नगंस".

"देईन तं भेईन काय ? काय करशील ? तुहं हितं राह्यलंय काय ? गठुडं भांद नि लाग चालायला त्या म्हाताऱ्याकडं".

"तुमीच दुसोटचास धिलं आन आता तूच म्हतारडा म्हन्तेस. काग न्योव ! तुबी फेडशील सारं. माहं वाट्टुळं केलं त्वा. भगादीला त्वा पढविलं आनं दुसोटचाला धिलं." आणि परीगा रडू लागली.

"मंग का घवू इकले सांग !"

"कोनी इकले ? कुनाचे इकले ?" भगवान आत येत म्हणाला. बायकोनं झाला प्रकार सांगितला. म्हणाली,

"हिनंच पढविला रामनाथाला. न्हाईतं काय टाप लागतीय त्येची वायलं निघाया".

"तू गप बसशील का गं ? काय टिटव्यायनी आरडताया ? व्हय गं परीगा, इकले घवू ?"

"इकलं तं हिचं काय गेलं रांडभवानीचं ? म्या माह्या भावाचे इकले ?

"आता त म्हनत व्हती न्हाई म्हून रांड."

"तू गप बसतीस का न्हाई ?" म्हणत भगवानानं चुलीतलं जळतं लाकूड खस्सदिशी पुढं ओढलं. जगूची बायको भाकरीला लागलेली. चुलीत ढणाढणा जाळ. लालसर प्रकाशानं चेहऱ्यांवरल्या रागाला आणखी लाली चढलेली. भगवानाच्या बायकोचे अंगारासारखे डोळे परीगावर खिळलेले. भगवान बायकोवर फुसफुसतोय् हातात लाकूड घेऊन. भगवानाची बायको किंचाळली,

"तिच्यापायी मारा मला. जीव घ्या ! आजवर तिच्यापायीच मार खाल्ला. लगीन करून तिचा जाळ केला तरी मारा. घवू इकल्याले राह्यले बाजूला. वर हिचाच जोरा !" आणि रडू लागली.

"मंग भेईन का काय ?" परीगा म्हणाली. भगवानाच्या हातातलं कोलीत गळून पडलं. कुणाचीच समजूत काढता येईना.

"भाकर वाड !" तो ओरडला. बायको फुसफुसत त्याला जेवायला वाढू लागली. रामनाथ आला नि उपऱ्यासारखा ओसरीवरल्या खांबाला चिकटून घुम्यागत बसून राहिला.

"भाकर खायाची न्हाय रं रामनाथा ?" भगवानानं आतूनच विचारलं. रामनाथ गपगार. एक नाही नि दोन नाही.

"आरं आमी मानसं हावंत का जनावरं ?"

"भाकर खाल्ली म्या. परीगाच्या घरी"

"सोयऱ्याकडं ? आन् परीगा तं हितंच रं ?"

"आसली म्हून काय झालं ?"

"लईच तिढ्यानं वागायया लागलं रं !"

"!"

"बरं, म्हननं तरी काय हाये तुहं ? ही परीगा म्हन्ती ते खरं का ?"

"व्हय मला वाटून पाह्यजी. उद्याच वायलं निघायचं. पंच जमवा. श्येताच्या दोऱ्या टाका.

भांडीकुंडी संध्याकाळी वाटू." म्हणत झटक्यान रामनाथ भुंड्याचं धोतर झटकत उठला नि अंधारात दिसेनासा झाला. भगवानाच्या घशात घासाचा तोटरा बसला.

भगवान माझ्यासमोर खाली मुंडी घालून बसलेला. पडलेली काडी उचलून दात टोकरू लागला.

"भगवानराव, मग विचार करण्यात काय अर्थ ? आल्याप्रसंगाला तोंड द्यायला हवं. उद्या भाऊ-भाऊ वेगळे व्हायचे ते आजच होणार. अधिक काय व्हायचं ? ही जगाची रीतच. रामनाथ म्हणतो वाटून द्या. धाकटा भाऊ आहे वाटून देणं भाग आहे."

"पर आठद्या रोज बी झाल्याले न्हाईत लग्नाला. जग काय म्हनंल ?"

"जग काय म्हणेल ह्याचा विचार करीत बसू नये. जगाचं तोंड उघडचं असतं. आपलं कर्तव्य आपण करीत रहायचं. मग जगाला ते वाईट दिसो की चांगलं."

"पर मनाला लई आवघाड लागतंय. रामनाथाला पोटच्या गोळ्यावनी वाढविला म्या. चाहेल तसे लाड केले. घे म्हणलं घेतलं. कर म्हणलं केलं."

"केलेलं कुणी आठवत नाही भगवानराव. सरतेशेवटी धाकटे उपकार विसरतात. तुम्ही तुमचं कर्तव्य केलं म्हणतात. ही जनरीत. ते विसरावं लागतं. जा, तुम्ही कामाला लागा. होतं त्याला इलाज नसतो".

भगवान जड मनानं उठून चालू लागला. मला त्याची कीव येत होती. आपल्याही आयुष्यात हे घडणार म्हणून मन धास्तावत होतं. होणार ते होत आहे ! व्यर्थ चिंता करू नये, हे तुकारामांचं वचन आठवून चालायचं.

शेतांना दोऱ्या टाकल्या गेल्या. मोजमापं झाली. जमिनीच्या वाटण्या झाल्या. माणसांच्या राहिल्या. थोरला भाऊ रानात रहायचा. लग्न झालेलं नव्हतं. संसार नव्हता. म्हातारा बापही मळ्यातल्या सपरात पडून रहायचा. अर्धी लाकडं मसणात गेलेला पण त्याला दोन वेळेला पोटाला व्यवस्थित मिळायला हवं होतं. शिवाय म्हातारपणी त्याची सेवाही करायला हवी होती. थोरला भाऊ रानात कष्ट करी. बैलांना वैरण-पाणी. औतकाठी. पण वारस नसलेला. रामनाथ म्हणाला,

"वापू राहील माह्यात".

"आन म्हातारा ?"

"त्यो तू संबाळ".

"वा रं न्योव. आईबाला धाकट्यानी संबाळायचं आसतं अशी रीत. वापू औतकाठी करन्यासारखा म्हून त्यो तुला हवा. आन् म्हातारा काय कामाचा न्हाई म्हून मला. लईच शाणा झालास रं रामानाथा." भगवान म्हणाला.

"मंग थोरला कह्याला झालास रं ?"

"मी थोरला न्हाई. वापू थोरला."

"त्येला वाईल ना प्वार. त्ये काय न्हाई. म्हतारा मला नगू."

"तू नगू म्हनलास म्हून आमाला का टाकता यतंय ? ती जाऊ दी. सगळ्या शेतीवाडीचं आठ हजाराचा बोजा हाये."

"आँ ? आत ह्यो बोजा कव्हा करून ठुलास ?"

"त्ये घर चालवणाऱ्याला ठाव आसतं. घर चालवायचं म्हंजी कायी हुल्डा फुकायचा न्हाई ! म्या झक मारली म्हण".

"ही भाषा बरी नाही भगवानराव. त्याला नीट समजाऊन द्या !" मी म्हणालो. "थोड्या करता खळखळ कशाला ?"

मग भगवानानं सगळ्या कर्जाचा खुलासा केला.

"उसाची जमीन माह्याकडं दी !" भगवान म्हणाला.

"आन् बोजा ?"

"पाच हजाराचा मी फेडतो. तू तीन हजाराचा फेड".

"ते जमायचं न्हाई. ऊस मला पाह्यजे. मी फेडतो पाच हजार".

"पहाय ! मागून नगं कटकट".

भगवानाकडं सारी पडेल जमीन आली. बाप वाटयावर आला. त्यानं जगूला–मधल्या भावाला विचारलं,

"जगू, तुला माह्यातून वायलं निघायचं काय?" पुना खिटखिट नगू." जगूच्या डोळ्याना पाणी आलं. म्हणाला,

"मी तुह्यातच ऱ्हाईन".

"कारं, लक्ष्मी, पसंत हाय तुला?" भगवानानं जगूच्या वायकोला विचारलं. जगूचं आणि बायकोचं जरा तेढंच होतं. घरी आला की जगू तिला लाथा घालायचा. माझ्या जवळच वसून रहा म्हणायचा.' लक्ष्मीला त्याचं वागणं पसंत नव्हतं. भगवानाचा आधार वाटायचा. लोक बोलायचे, भगवानाचं नि जगूच्या बायकोचं काहीतरी आहे. भगवानाच्या तोंडावर कोण बोलेल? सारं पिछाडीनं. भगवानाला याची कुणकुण लागलेली. म्हणूनच त्यानं जगूला सडेतोड विचारलं.

संध्याकाळी भांडयांच्या वाटण्या. रामनाथ आला. एकएक भांडयाची वाटणी. जगू आला नि ओसरीवरच उकीडवा बसला. ढसढसून रडू लागला. भांड्यांचे आत खणखण आवाज. पंचाच्या साक्षीनं भांडयांच्या वाटण्या चाललेल्या. ही वाटी रामनाथला, ही जगूला. ही काशाची भगवानला. तवे दोन एक जगूला एक रामनाथला. भगवानला तवाच नाही.

एका कुटुंबाच्या चिंध्या झाल्या. जगू रडत होता. भगवान त्याची समजूत काढत होता. रामनाथ दगडाच्या काळजानं पहात होता. त्याच्या डोळ्यात संसार भांडयांच्या रूपानं चकाकत होता. एकएक भांडं तो विनाकारण पारखून घेत होता.

कुटुंब फुटलं होतं. एकीला खीळ बसली होती. भगवानाच्या मनाच्या चिंध्या झाल्या होत्या. लग्नानंतर आठच दिवसात रामनाथ वायलं निघाला होता आणि जगाला सारं अजाप वाटप होतं. रामनाथाच्या बायकोनं चांगली करणी केली असं जग कुजबुजत होतं.

आणि भाडयानं आणलेल्या नि सध्या रामनाथाच्या बायकोच्या पायातल्या तोडयांचा नवाच प्रश्न आ वासून भगवानच्या पुढं उभा राहिला.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

साहित्य अकादमीचे उपक्रम / सुनील सुभेदार

'साहित्य अकादमी' ही काय चीज आहे ?— असा प्रश्न साहित्य आणि साहित्यिक चळवळींविषयी आस्था असणाऱ्या सुबुद्ध, रसिक वाचकाला विचारला तर तो बहुधा असे सांगेल की विदर्भातल्या एखाद्या मान्यवर साहित्यिकाची अकादमीवर नेमणूक झाल्याची बातमी आम्ही अधून मधून वाचतो आणि दरवर्षी मराठीतील सर्वोत्कृष्ट पुस्तकाला अकादमी-तर्फे पारितोषिक दिले जाते हे आम्हाला माहीत आहे. या व्यतिरिक्त अकादमीचे काही उपक्रम असतील तर त्यांची आम्हाला कल्पना नाही आणि त्या माहितीचा आम्हाला उपयोगही नाही. कारण विदर्भासारख्या उपेक्षित विभागांत राहणाऱ्या साहित्यप्रेमींचा भारताच्या राजधानीतील अकादमीशी प्रत्यक्ष संबंध येणे हे तसे दुर्घटच आहे !

वस्तुस्थिति मात्र अशी नाही. विदर्भातील लेखक, संशोधक, ग्रंथपाल, प्रकाशक, मुद्रक आणि ग्रंथविक्रेते या सर्वांनाच, त्यांनी पुढाकार घेतला आणि चिकाटी दाखविली तर, अकादमीचा लाभ घेता येईल. अकादमीने आपल्या उपक्रमांचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे ही अपेक्षा अगदी योग्य असली तरी सरकारी खाते जसे नियमांवर बोट ठेवून वागते, तशीच अकादमीचीही कार्यपद्धति आहे हेही लक्षांत ठेवले पाहिजे. प्राप्त परिस्थितीत आपला लाभ साधण्यासाठी आपणच प्रयत्न केला पाहिजे अशा वृत्तीने विदर्भातील ग्रंथव्यवसायी आणि ग्रंथप्रेमी मंडळींनी अकादमीकडे आपले लक्ष वळविले तर ते सर्वांच्याच हिताचे होईल.

उदाहरणार्थ, साहित्य अकादमीने हजारावर अभिजात ग्रंथ प्रकाशित केलेले असून अतिशय कमी किंमतीत ते उपलब्ध होऊ शकतात. पण हे ग्रंथ आम्हाला पुस्तक विक्रेत्यांकडे किंवा वाचनालयात क्वचित्‌च दिसतात. दैनिकातून किंवा मासिकातून त्यांच्या जाहिरातीही दिसत नाहीत. कारण ? कारण अगदी साधे आहे. अर्ज केल्याशिवाय जाहिरात देण्याची अकादमीची पद्धत नाही. तेव्हा, विदर्भातील आणि विशेषतः नागपुरातील दैनिकांनी, पाक्षिकांनी, मासिकांनी या बाबतीत पुढाकार घेऊन जाहिराती मिळवल्या तर त्यांचा आणि वाचकां-चाही लाभ होईल. साहित्य अकादमीच्या इंग्रजी, हिंदी, मराठी आणि संस्कृत प्रकाशनांचा लाभ या भागातील वाचकांना आणि अभ्यासकांना अद्याप फारसा झालेला नाही. या दृष्टीने प्रयत्न होणे अगत्याचे आहे.

साहित्य अकादमीच्या पुस्तकांचे मुद्रण दिल्ली-मुंबई सारख्या महानगरांतच होते असे नाही. ते नागपुरातही होते—झालेलेही आहे. त्यामुळे मुद्रकांनी या दृष्टीने प्रयत्न केल्यास किफायतशीर दरात त्यांना पुस्तके मिळतील आणि अकादमीचे मुद्रक म्हणून मान्यताही मिळेल. ललित साहित्य आणि संशोधन यांच्या प्रकाशनासाठी अकादमीच्या ज्या योजना आहेत, त्यांच्याकडे आम्ही आजवर अजिबात लक्ष न पुरविल्यामुळे आर्थिक सहाय्याच्या एका मोठ्या स्रोताला आम्ही मुकलेलो आहोत. ही माहीती लेखकांनी आणि प्रकाशकांनी मागवून प्रयत्न केला पाहिजे.

साहित्य अकादमीच्या प्रकाशनाबाबत ग्रंथविक्रेत्यांनी ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की त्यांची विक्री केवळ आर्थिक दृष्टीने किफायतशीर होईल असे नव्हे, तर काही प्रकाशने शेकड्याने विकता यावीत अशी आहेत. उदाहरणार्थ, 'मेकर्स ऑफ मॉडर्न लिटरेचर' ही इंग्रजीतील 'इंग्लिश मेन ऑफ लेटर्स,' या मालिकेवर बेतलेली चरित्रात्मक ग्रंथमाला अत्यंत लोकप्रिय व्हावी अशी आहे. मोठ्या वाचनालयांपासून शाळेच्या लहानशा पुस्तकाच्या कपाटापर्यंत सर्वत्र या ग्रंथमालेचा—किंमत केवळ अडीच रुपये असल्यामुळे—सहज संचार होऊ शकतो. साहित्य अकादमीची ग्रंथ सूचि मागवून त्यांनी या दिशेने प्रयत्न मात्र केला पाहिजे.

लेखकांनी प्रवास करावा आणि आपले अनुभवविश्व समृद्ध करावे यासाठी अकादमी दर वर्षी प्रत्येक भाषेतील एका लेखकाला दोन हजारांपर्यंत, कोणत्याही अटी न घालता, अनुदान देत असते. या अनुदानाचा लाभ विदर्भातील एकाही लेखकाला झाल्याचे माझ्या ऐकिवात नाही. कारण, लेखकांना या योजनेची माहिती नाही, म्हणून त्यांचा अर्ज नाही व म्हणून त्यांच्या नावांचा विचार करणे शक्य नाही ! विदर्भातील लेखकांनी जागरूकतेने ही माहिती काढून योग्य वेळी आपले अर्ज रवाना केले तर त्यांना हे अनुदान कदाचित् मिळूनही जाईल.

याचाच अर्थ असा की साहित्य अकादमी ही साहित्यप्रेमी वाचकांच्या आणि साहित्योपजी व्यावसायिकांच्या आवाक्यातली संस्था आहे. त्यांनी तिच्या उपक्रमांकडे अधिक लक्ष पुरवावे आणि या भागांतील वाङमयीन अभिरुची उन्नत व्हावी म्हणून प्रयत्न करावेत एवढ्याच उद्देशाने या लेखाचा प्रपंच केलेला आहे.

⊕ ⊕ ⊕

विदर्भ साहित्य संघ

झांशी राणी चौक, नागपूर–१२

आवाहन

विद्यार्थ्यांनो !

लवकरच आपल्या परीक्षा संपतील आणि आपणाला उन्हाळ्याच्या प्रदीर्घ सुट्या मिळतील. ह्या सुट्ट्यांचा आपण काही उपयोग करण्याचे योजिले असेलच. त्यात भर म्हणून किंवा आपण अद्याप तशी काही योजना आखली नसल्यास, आपणास विचार करता यावा म्हणून विदर्भ साहित्य संघ आपणाकरिता खालील योजना सादर करीत आहे.

पुढल्या वर्षी "युगवाणी"चा एक अंक विद्यार्थी साहित्य विशेषांक म्हणून काढण्याची योजना आहे. तेव्हा आपण आपल्या प्रतिभेला आणि कल्पकतेला थोडं जागवा आणि लघुकथा, कविता, काही अविस्मरणीय घटना किंवा काही आपले इतरांना सांगण्यासारखे अनुभव सुव्यवस्थित शब्दांत मांडण्याचा प्रयत्न करावा आणि सुट्टी संपताच हे लिखाण सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२ यांचेकडे पाठवा. लिफाफ्यावर "विद्यार्थी साहित्य विशेषांकासाठी" असे लिहा आणि परतीसाठी / अर्थात याला त्या अंकात वाव देता आला नाही तर / पुरेसे पोस्टेज लावावे. त्यातल्या उत्कृष्ट अशा तीन लघुकथांना, कवितांना आणि इतर फुटकळ कथांना योग्य ती बक्षिसेही देण्यात येतील.

तसेच पुढल्या वर्षी आपल्यासाठी बाल नाट्य स्पर्धा, संगीत स्पर्धा, बाल चित्रकला स्पर्धा, रानडे वक्तृत्व स्पर्धा आणि नव्यानेच सुरू झालेली कथा कथन स्पर्धाही आयोजित होत आहेत. तेव्हा आपण ह्या स्पर्धांच्यांसाठीही आपली तयारी नव्या जोमाने करावी आणि ह्या सर्व, साहित्य संघाने, आपल्यासाठी योजिलेल्या योजनांना बहुसंख्यतेने प्रतिसाद द्यावा. विदर्भ साहित्य संघ आपलाच आहे हीं जाणीव मात्र असू द्यावी. ह्या बाबतीत काही मार्गदर्शन हवे असल्यास किंवा आधीचे स्पष्टीकरण हवे असल्यास आपण वि. सा. संघात बुधवार सोडून सकाळी ८-३० ते ११-०० व सायंकाळी ५-३० ते ८-०० ह्या कार्यालयीन वेळेत येऊन चौकशी करावी.

डॉ. मधुकर आष्टीकर
अध्यक्ष.

टिप :––हे सर्व साहित्य १५ ऑगस्टपर्यंत पाठवावे.

संत नामदेव आणि कबीरदास / अशोक कामत

नामदेवांचा भक्तिभाव त्यांच्या हिंदी पदावलीत अनेक ठिकाणी दिसून येतो. अद्वैत भक्तीचे हे सुरेख स्पष्टीकरण राष्ट्रवाणी हिंदीच्या माध्यमातून करून संत नामदेवांनी समस्त भारतीयांना ईश्वर अन् साधक यांच्यातील अतूट नात्याची जाणीव करून दिली.

उत्तरेतील संत परंपरेचे आदिगुरू नामदेव

नामदेवांच्या समन्वित विचारातून धर्मजागरणा बरोबरच धर्मरक्षणाला मदत झाली. मराठी बरोबर हिंदीतही अशी समन्वयाची शिकवण सांगणाऱ्या नामदेवांनी एक प्रकारे समस्त भारतीय समाजाला सात शतकांपूर्वी संघटित करण्याचा प्रयत्न केला. हिंदी साहित्याचे अनेक अभ्यासक-संशोधक नामदेवांचे हे चिरंतन ऋण मोकळ्या मनाने कबूल करतात. या बाबतीतील एक प्रातिनिधिक मत पाहण्यासारखे आहे :—

"नामदेव की जो कुछ हिंदी रचनाएँ प्राप्त हैं, उनमें उत्तर भारत की संत परंपरा का पूर्व आभास मिलता है, और उनके परवर्ती संतों पर निश्चय ही उनका प्रभाव पडा है, जिसे उन्होने मुक्तकंठ से स्वीकार किया है। ऐसी दशा में उन्हें उत्तर भारत में निर्गुण भक्ति का प्रवर्तक मानने में हमें कोई झिझक नहीं होनी चाहिए।" (आचार्य विनयमोहन शर्मा / 'हिंदी को मराठी संतोंकी देन')

अनुभवप्रामाण्य, हरिनामस्मरणाचा आग्रह, सद्गुरूकृपाप्रसादाचे महत्त्व, बाह्याचाराचा कडक भाषेत निषेध, जातिपातीचा विरोध, ईश्वराच्या सर्वव्यापकत्वाचे प्रतिपादन आणि सहज भक्तीचा उत्कट पुरस्कार—ही सारी 'हिंदी संतमता'ची ठळक वैशिष्ट्ये आपल्याला सर्वप्रथम संत नामदेवांच्या हिंदी भजनावलीत आढळून येतात. वस्तुतः या सर्व गोष्टीचे मूळ महाराष्ट्रातील नाथ-प्रभावित वारकरी तत्वज्ञानात आहे. नामदेवांना हा उदार विचारांचा वारसा महाराष्ट्रात लाभला. गुरु विसोबा अन् परमार्थपथ-प्रदर्शक ज्ञानदेव यांचेकडून मिळाला.

> राम भगति बिन गति न तिरन की।
> कोटि उपाव जो करही रे नर।।[१]

असा त्यांचा दृढ विश्वास आहे.

ईश्वर सर्वत्र आहे. तो प्रत्येकाच्या ठायी आहे. मायेच्या मोहपाशामुळे त्याचे अस्तित्व आपण जाणत नाही. म्हणून साधकांस नामदेव म्हणाले आहेत,

> कांडि दे रे हमिता ममिता।
> सब घट राम रह्यो रमि रमता।।

प्रभुरामाच्या अलौकिक रूपाचे दर्शन घडविणारा परमशक्तिशाली सद्गुरु नामदेवांना "परम आधारू" वाटतो. प्रत्येक "घटिभीतर" "अडसठ तीरथ" गुरु त्यांना दाखवितो. म्हणून ते म्हणतात,

> सति सति सति सति सति गुर देव।
> झूठु झूठु झूठु झूठु आन सभ सेव।।

साधनेच्या प्रवासात सद्गुरु लाभ अन् कृपा यापरते दुसरे थोर सत्य नाही.

"बिठलू बिना संसारू नाही" असा "जिकडे पाहावे, तिकडे देव" हा परमानुभव साधकास गुरुकृपेने प्राप्त होतो. "समु गोबिंदु है, समु गोबिंदु है। गोबिंदु बिना को बोले रे।।" अशी त्यांची अनुभूती आहे.

साधनेचा सोपा मार्ग म्हणजे हरिनामस्मरण—

> हरि नाव हीरा हरि नाव हीरा।
> हरि नाव लेत मिटै सब पीरा।।
> हरि नाव जाती हरि नाव पाती।
> हरि नाव सकल जीवन में क्रांती।।

अशी रामनामाची महती सांगणारी कितीतरी पदे नामदेव लिहितात. ईश्वर प्राप्तीसाठी बाह्यावडंबर माजविणाऱ्यांचा ते कठोर शब्दांत निषेध करतात—

---

(१) या टिपणांतील सर्व अवतरणे संत नामदेवांच्या **'मुखबानी'** तील असून ती 'गुरुग्रंथसाहेबा'त समाविष्ट आहेत.

काहेकू कीजै ध्यान जपना ।
जो मन नाही सुध अपना ।।

त्यांनी जातपात मानली नाही. जे मानीत त्यांना कडक शब्दात सुनावले. कथनी आणि करनी यात भेद नसावा असा त्यांचा कटाक्ष असे. कर्तव्य आणि भक्ती, प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालावी असा त्यांचा प्रयत्न होता. म्हणूनच ते असा निर्वाळा देतात,

मन मेरे गजू जिव्हा मेरी काती ।
मपि मपि काटउ जम की फासी ।।
कहा करउ जाति कहा करउ पाती ।
राम को नाम जपउ दिन राती ।।
सुइने की सुई रूपेका धागा ।
नामे का चितु हरिसउ लागा ।।

'हिंदी संतमता'ची सगळी वैशिष्ट्ये संत नामदेवांच्या हिंदी पदावलीत कशी स्पष्टपणे दिसून येतात याची चर्चा पूर्वी एका लेखाद्वारे केली आहे.[२] ती जिज्ञासूंनी अवश्य पाहावी.

नामदेवांना दीर्घ आयुष्याचे वरदान लाभले त्याचा उत्तम उपयोग करून त्यांनी मराठी प्रदेश आणि महाराष्ट्राबरोबर गुजरात, राजस्थान, पंजाब अशा अनेक भाषाभाषी समाजात जाऊन चिरस्मरणीय लोकजागरण–कार्य केले. नामदेवांचे समकालीन आणि उत्तरकालीन हिंदी–मराठी संत त्यांचा एकमुखाने गौरव गातात.

हिंदी संतांनी केलेला नामदेव-गौरव

हिंदी संतकाव्याचे श्रेष्ठ तत्वज्ञ कवी महात्मा कबीर "गुरुपरसादी जैदेव नामा । प्रगटिके प्रेम इन्है के जाना ।।" असा नामदेवा विषयीचा श्रद्धाभाव व्यक्त करतात. "नामदेव कबीर तिलोचन सधना सेन तरै" या शब्दात रविदासांनी नामदेवांचे श्रेष्ठ पूर्वसूरित्व सांगून ठेविले आहे.

"नामा छीवा कबीरु जुलाहा,
पूरे गुरते पाइ ।।"

अशी गुरु नानकदेवांची "नामदेव ब्रह्मरूप" झाल्याबद्दलची ग्वाही आहे.

रज्जबदास, सुंदरदास, अमरदास, पीपा अशा अनेक हिंदी संतकवींनी आणि शीख सद्‌गुरूंनी नामदेव-कार्याचा महिमा कथन केला आहे. यातून खालील निष्कर्ष काढता येतील :—

१. संत नामदेवांनी फार पूर्वी हिंदीतून सत्य-धर्मप्रचार केला.
२. त्यांचे हे कार्य हिंदी संतमंडळाने प्रशंसिले आहे.
३. त्यांना हिंदी संत परंपरेचे प्रवर्तक मानावयास हरकत नसावी.

संत नामदेव आणि संत कबीर

संत कबीरदासांच्या जन्म व मृत्युवर्षा विषयी हिंदी विद्वानांचे एकमत अद्यापि होऊ शकलेले नाही. परंतु बहुतेक विद्वान त्यांचा जन्म सन १३९७ च्या आसपास मानतात. त्यापूर्वी सिद्ध करू शकत नाहीत. कबीर दीर्घायुषी होते. त्यांचे मृत्युवर्ष बरेच विद्वान सन १५१७ च्या आसपास असल्याचे सांगतात. यावरून खालील गोष्टी आपल्या ध्यानात येतील :–

१. संत नामदेवांचा जन्म (सन १२७०) म्हणजे संत कबीरदासांच्या पूर्वी किमान एकशे सत्तावीस वर्षे आधी झाला होता.

२. संत नामदेवांचे मृत्युवर्ष (सन १३५०) आणि संत कबीरदासांचे जन्मवर्ष यात देखील किमान सत्तेचाळीस वर्षांचे अंतर आहे.

३. संत कबीरदास आणि त्यांच्यानंतर झालेल्या बहुतेक सर्व हिंदी संतकवींनी संत नामदेवांचा कृतज्ञ अंत:करणाने उल्लेख केला आहे आणि त्यांच्या उदात्त विचारधारेचे अनुसरणही केलेले आहे.

कर्तव्यकर्म आणि विरक्तिभाव यांचा समतोल, धर्माधर्मातील वा जातिजमातीतील भेदभाव न मानता ईश्वरोपासनेचा अधिकार सर्वांस असल्याचे आवर्जून सांगणे, ईश्वराच्या सर्वव्यापकतेचा आणि सगुण-निराकाराच्या एकत्वाचा पुरस्कार करणे, अनन्य भावनेने समर्पणशील प्रेमसाधना अन् नामसाधना करणे, या कबीर-काव्यातील सर्व वैशिष्ट्यांचा प्रेरणास्रोत नामदेववाणीत पाहता येऊ शकतो.

नामदेवांची हिंदी भाषा स्वाभाविकच थोडी अनगड आहे. कबीरदासांची हिंदी भाषा अधिक समर्थ अन् प्रभावी आहे.

⊕ ⊕ ⊕

---

(२) 'हिंदी संतपरंपरेचे आदिगुरु' । डॉ. अशोक कामत । 'प्रसाद', पुणे, दीपावली, १९७०.

महाराष्ट्रीय आडनावे : काही शोध आणि बोध / रामगोपाल सोनी

जगाच्या इतिहासात नावांची आणि आडनावांची परंपरा फारच प्राचीन आहे. नामकरण करण्याची प्रवृत्ती ही सहजप्रवृत्ती आहे. नाव ही एक मनुष्याची गरज आहे. नाव हे मनातील भावनांचे एक प्रतीक आहे. नावाद्वारे व्यक्तित्व प्रकट होण्यास मदत होते. नाव मनुष्याच्या बाह्य व आंतरिक स्वरूपाचे प्रतिनिधित्व करते. नावाचा संबंध विशेषेकरून गणना, घटना आणि भावना यांच्याशी असतो. गणनेच्या आधारावर ठेवल्या जाणाऱ्या नावात ग्रह, नक्षत्र, राशी आणि फलयोगाचे लक्ष ठेवले जाते. अशा प्रकारच्या नावांना वैधानिक नावे असे म्हणतात. आमच्या विद्वानांनी (आश्वलायन आणि पारस्कर गृह्यसूत्रात) या नावाच्या स्वरूपाबाबत बराच विचार केलेला आहे. 'ज्ञायते पितृ पांडित्य नामधारण कारणात्' असे म्हणून प्रत्येक वडिलाने आपल्या संततीस सुंदर नावे देण्याचा प्रघात पाडलेला आहे. या नावाशिवाय दुसऱ्या प्रकारचीसुद्धा प्रवृत्तीमूलक नावे आहेत. या नावात मानवाच्या भावना (स्नेह, हास्य, व्यंग, निंदा) इत्यादी प्रगट होतात.

महाराष्ट्रीय आडनावांना आम्ही प्रवृत्तीमूलक आडनावे म्हणू शकतो. कारण की, अशा प्रकारच्या आडनावात महाराष्ट्राचे अंतरंग व जीवन चित्रित झाले आहे. महाराष्ट्रात चित्रविचित्र आडनावे ठेवण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यांत महाराष्ट्राची स्वातंत्र्यप्रियता, नवीनता तसेच शोधक प्रवृत्ती यांचे प्रतीक आढळते. याच प्रवृत्तीमुळे आडनावांत विचित्रता, विविधता तसेच अनेक रूपांचे दर्शन होते. अशा प्रकारच्या आडनावांत महाराष्ट्राची संस्कृती आणि विचारसरणी आढळून येते.

महाराष्ट्रीय आडनावांची संख्या फारच मोठी आहे. जगातल्या कोणत्याही देशात इतक्या प्रकारची आडनावे आढळत नाहीत. रालेंड हंटफोर्डने सांगितले आहे, "स्वीडन देशाच्या लोकसंख्येच्या एकूण पंचाहत्तर लाखांपैकी एक तृतीयांशाहून जास्त भागात सर्व मिळून फक्त एकोणवीस प्रकारांपर्यंतच आडनावे आहेत."

महाराष्ट्रातील आडनावात महाराष्ट्रातील शहरे, गावे, व्यवसाय, धर्म, संप्रदाय, तसेच निरनिराळ्या मनोभावांचे चित्र आढळून येते. थोडक्यांत, आडनावे ही देशाचे व समाजाचे आरसे आहेत. प्रस्तुत लेखात देशमुख व देसाई या आडनावांविषयीची माहिती देत आहे.

देशमुख

'देशमुख' याचा शाब्दिक अर्थ देशमुख्य असा होतो. प्राचीन संस्कृत ग्रंथात 'देशमुख' या शब्दाचा उल्लेख आढळत नाही. परंतु 'देशमुख' या शब्दाच्या समानार्थी असलेला 'विषयपती' (जिल्हाधीश) नामक अधिकारी होता असे दिसून येते. कालक्रमानुसार ह्याच विषयपतीला 'देशमुख' म्हणू लागले. श्री. शंकर नारायण जोशी यांच्या मते 'देशमुख' हा शब्द मुसलमान शासनकालात उपयोगात आणला गेला. 'देशमुख' या शब्दातील देश हा शब्द क्षेत्रसूचक आहे. परगणा या शब्दासाठी देश या शब्दाचा उपयोग होत असे. गुप्त व कलचुरी यांच्या लेखांमध्ये 'देशाचे' क्षेत्रफळ तीस ते चाळीस चौरस मैल होते असे वर्णन करण्यात आले आहे.

'देशमुख' या शब्दाशी समानार्थी असणारे आणखी दोन शब्द आहेत. ते म्हणजे 'देसाई' आणि 'नाडगौडा'. कोकणात देशमुखांना 'देसाई' व कर्नाटकात 'नाडगौडा' म्हटले जात असे. 'नाड' (नाडू) चा अर्थ होतो 'प्रांत' आणि 'गौडा'चा अर्थ होतो 'पाटील'. कर्नाटकात मिळालेल्या अनेक ताम्रपत्रांवरून असे दिसून येते की ग्रामगंड (संस्कृत+कन्नड) या शब्दाचा त्यात वारंवार उल्लेख करण्यात आला आहे.

गंड या शब्दाचा अर्थ होतो पती. म्हणजे ग्रामगंड ह्या शब्दाचा अर्थ झाला ग्रामपती. या

ग्रामगंड शब्दापासून पुढे गौडा हा शब्द तयार झाला. [ग्रामगंड > गाउंड > गावूंड > गौडा > चा अर्थ उद्भूत वा व्युत्पन्न असा होतो] कर्नाटकात पाटलाला 'गौडा' म्हणतात. कर्नाटकातील पत्र-व्यवहारावरून असे दिसून येते की 'नाडगौडा' या शब्दाप्रमाणेच 'देसाई' या शब्दाचाही उपयोग करण्यात येत असे.

प्रा. शेजवलकर हे या दोन अधिकाऱ्यांना शिवाजीच्या वेळचे देशमुख आणि पाटील मानतात. त्यांच्या मते "शिवाजीचे देशमुख (साहसाधिपति) व पाटील (भागग्राही) हे मराठे असत". परंतु श. ना. जोशी मात्र प्रा. शेजवलकरांच्या ह्या मताला विरोध करतात. त्यांच्या मते साहसाधिपती चा अर्थ होतो दंडाधिकारी अर्थात फौजदार आणि भागहारीचा अर्थ होतो कमविसदार अर्थात तहसील-दार. मुसलमानाच्या पूर्वी देशमुखाला विषयपति असे म्हणण्यात येत असे.

आज्ञापत्रात शिवाजीराजांनी म्हटले आहे :— "राज्यांतील वतनदार देशमुख व देश कुलकर्णी पाटील आदि करुन यांसी वतनदार म्हणोन म्हणावें, हे प्राकृत परिभाषा मात्र आहे. ते स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत. त्यांस साधारण गणावें यैसे नाहीं. हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत". अर्थात देशमुख आदि स्वतंत्र देशनायक आहेत व राज्याचे भागीदार आहेत. गावातील संपूर्ण जमीन, शेतीयोग्य जमीन आदी पाटलाच्या अधिकारात असे. त्याचप्रमाणे परगण्यातील संपूर्ण जनता व भूमी देशमुखाच्या अधिकारात असे. जर राजाला अन्न आदी प्रजेकडून घ्यायचे असेल तर ते अन्नधान्य त्याला देशमुख व देशपांडे यांच्या मार्फत मिळवावे लागत असे.

देशमुख व देशपांडे यांच्या कामाचे निरीक्षण करण्यासाठी 'सुभेदार' नावाचा अधिकारी राहत असे. तो देशमुख व देशपांडे यांच्या माध्यमाने जनतेतर्फे कर वसूल करीत असे, स्वतंत्रपणे मात्र नाही. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की सरकार व जनतेचा सरळ संबंध नव्हता, तर देशमुख हा या दोघांना जोडणारा दुवा होता. परगण्याच्या तर्फे सरकारला देशमुख जबाबदार असे. देशमुख हा परगण्याचा शाश्वत अधिकारी होता. त्याचे पद अबाधित रूपाने चालू असे. राज्य जरी बदलले तरी देशमुखी बदलत नव्हती. त्याच्या सीमाक्षेत्रात कसलेही परिवर्तन होत नसे. महाराष्ट्राच्या काही भागात निजामशाही व आदिलशाहीचे प्रभुत्व होते आणि काही भाग मोगल राज्यात मिळवल्या गेला तरी शितोळे देशमुखांचा अधिकार जशाचा तसा कायम होता; त्यात कुठलेही परिवर्तन झाले नाही. ग्रामीण क्षेत्रात देशमुखाचे इतके प्रभुत्व राहत असे की त्यामुळे नव्या राजाला देशमुखाला मान्यता द्यावीच लागत असे. देशमुखाचे पद राजेलोकांना देखील आकर्षित करीत असे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहू महाराज कैदेतून सूटून जेव्हा साताऱ्याला आले तेव्हा त्यांनी वाईच्या देशमुखीवर प्रथम अधिकार केला. आणि 'देशमुख वाई प्रांताचा' शिक्का बनवला. यावरून हे स्पष्ट होते की, छत्रपती देखील या पदाचे इच्छुक होते. कारण जनतेत देशमुखाचा मान राजापेक्षा अधिक होता. देशमुखाचे मुख्य कार्य परगण्यात नवीन वस्ती तयार करणे, शेती करवून घेणे आणि कर वसूल करणे हे होते. पेशवे दप्तरात देशमुखांच्या कार्याचा उल्लेख आहे तो 'गाव वसाहत व लावणी' असा. देशमुख कर वसूल करीत असे याचा उल्लेख एका पत्रात आहे तो असा :— "पातशाही अमील येत होता तो जमीदाराचे (देशमुख) विद्यमाने पैसा घेत होता". अफजुल-खानाने देशमुखांच्या कार्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे :— "देशमुखचे काइदा आहे की विलायती फिरोन एक तसू पडू नेदीता जे पडी जमीन पडले आसेल त्यास नांगरचे व इस्तावेचे कौलबोल देवाऊन तमाम जमीन कीर्दी करावे, साल बसाल दस्त चढत आसावे हे तुमचे खेश आहे". मसुर परगण्याचे देशमुख जगदळे यांना देखील अशाच प्रकारचा आदेश दिला गेला होता. तो असा :— "तुम्ही परगणे मजकुरच्या मोकदमांस व करावे मजकुरच्या सेटे महाजनास कौल देऊन आबादी व हस्तमालतीस (लावणी संचणीस) कोसीस करून किफायत सरकार व रफायत राया अमलात आणोन व हर एक असामीस तुम्ही आपला कौल देऊन आणाल त्याप्रमाणे चालविलें जाईल. सरकारचे काम ववने अहसान सरंजाम करीत जाणे".

शिवाजीकालीन देशमुखांच्या कार्याचे वर्णन पुढील प्रमाणे केले गेले आहे:—"गांवचा गांव फिरोन ऐसे करणे कीं अमका गांव त्यासी रकम अमकी, त्यासी अवल दूम सीम ऐसी जाती निवडोन, कस्त केलियाने काय पिकेल ते चौकस करून आकार करणे (ह्या) अखेर कामास ब्राह्मण अगर परभू (प्रभू) कारकुन ठेवावा तर तो गैरआरामी आणि त्याण काय करावे, जमिनीचे पोटफोडी गावी पीक काय, काय धारा हे त्या गरिवास (काय माहीत . .) तुमचे महालीचा मक्तेदार तुम्ही".

आतापर्यंतच्या उदाहरणांच्या आधारे आपण असे म्हणू शकतो की देशमुखाचे कार्य हे जनतेचा उत्कर्ष करणे, सरकारची सत्ता कायम राखणे, शेतसारा वसूल करणे, परगण्यातील संपूर्ण कृषियोग्य जमिनीची शेती करणे, परगण्यास संपन्न ठेवणे वगैरे होते. फेरीवाले, आठवडी बाजार, जत्रा वगैरेचे संरक्षण करणे, त्याचप्रमाणे नगरातील उद्योगधंद्याचा उत्कर्ष व वकोष्टी, धनगर, चांभार, सोनार, तेली, बुरुड, लोहार इत्यादी कारागिरांचे संरक्षण करणे, त्यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन देणे ह्या गोष्टी देखील देशमुखाच्या कार्याच्या कक्षेत येत होत्या. देशमुख आपल्या परगण्याचा मांडलिक राजा असे व त्याच्या खाली 'पेशवा' नामक अधिकारी असे.

प्रांतातील सगळ्या कार्यालयात त्याची मुद्रा (शिक्का) असे. वार्षिक जमाबंदी, त्याचप्रमाणे कुठल्या गावातून शेतीवर किती कर घ्यायचा, बाजारातील व्यापाऱ्यांकडून किती कर वसूल करायचा या सगळ्याबाबतचा निर्णय सरकारी मुजुमदार व सुभेदार हे देशमुखांच्या सल्याने घेत असत. परगण्यातील संपूर्ण भांडणाचे निर्णय देशमुखच देत असत. गावांच्या सीमा निश्चित करणे, गावातील जमिनीची नोंदणी ठेवणे, पिकाचे जनावरांच्या त्रासापासून संरक्षण करणे, ग्रामीण जनतेवर सावकार व सरकारी कर्मचारी यांनी अत्याचार करू नये याकडे देखील तो लक्ष देत असे. नवीन वसाहती निर्माण करणे, त्यांची व्यवस्था पाहणे, परगण्यातील कोणत्या व्यक्तीला बक्षीस द्यायचे त्याचप्रमाणे कुणाला 'मिराशी हक्क' द्यायचा याबाबतचे निर्णय देशमुखच घेत असे.

देशमुखाचा स्वत:चा शिक्का असे. त्यात देशमुखाचे नाव, देशमुखाचे अधिकार, परगण्याचे नाव आणि कृषि कार्य सूचक अशा नांगराचे चिन्ह असे. शाहू छत्रपतीच्या देशमुखीच्या शिक्क्यात 'नांगर' कोरलेला असे. काही शिक्के मराठी भाषेत तर काही फारशी भाषेत आहेत. देशमुखाच्या शिक्क्याचा मोठा मान होता. इंग्रजी शासनकालात या वतनदार (पैतृक अधिकारी) देशमुखांचे अधिकार संपले. १८६३ साली देशमुख आदी वतनदार अधिकार–विहीन झाले व हळू हळू त्यांचे अस्तित्व संपले. १८७० मध्ये इंग्रज सरकारने 'इनाम कमीशन' नियुक्त केले. कमीशनने बक्षीस मिळालेल्या जमिनीसंबंधाने अनेक उपाय सुचविण्यात आले. कमीशनच्या म्हणण्यानुसार इनामी जमीन सरकारने जप्त केली. ताम्रपट व सनदा देखील ताब्यात घेण्यात आल्या. वतनदारी समाप्त झाली व देशमुखांना पेन्शन देण्यात येऊ लागली. या पेन्शनला 'लवाजमा' म्हटले जात असे. अशा अधिकार नसलेल्या देशमुखांना "Ex paragana officers" अर्थात माजी परगणा अधिकारी म्हणू लागले.

देशमुख हे खऱ्या अर्थाने स्वतंत्र देशनायक होते. आता 'देशमुख' हा शब्द फक्त नावाची शोभा वाढवतो. परंतु या आडनावात देशमुखांच्या गतकालीन वैभवाचा व ऐश्वर्याचा इतिहास लपलेला आहे.

सरदेशमुख :

'सरदेशमुखा'चा अर्थ होतो देशमुखांचा प्रधान. सर–प्रमुख, श्रेष्ठ. शिवाजीच्या वेळेस दक्षिणेतील मुसलमानी राज्याकडून त्यांच्या उत्पन्नातील दहावा भाग कर रूपाने वसूल केला जात असे. यालाच 'सरदेशमुखी' किंवा चौथे (कर) म्हटले जात असे. 'सरदेशमुखी' वसूल करणारे जे अधिकारी त्यांना 'सरदेशमुख' म्हटले जात असे. सरदेशमुखीपासून मिळणारे उत्पन्न हे छत्रपतींचे असे.

सरदेशमुखाची नियुक्ती छत्रपती करीत असे. त्याचे कार्य मुसलमानी सुभ्यातून सरदेशमुखी अथवा चौथ (कर) वसूल करणे हे असे. सरदेशमुखाचे क्षेत्र देशमुखासारखे किंवा त्याहून मोठे देखील असे.

एकच व्यक्ती ही देशमुख व सरदेशमुख राहू शकत असे. मराठा राज्यात सरदेशमुखांचे पुष्कळच महत्त्व होते. ते शासनाचे महत्त्वपूर्ण अंग होते.

देसाई

'देसाई'चा अर्थ होतो देश -स्वामी. देशस्वामी हा शब्द विकसित होऊन देशस्वामी > देशसाई > देसाई असे रूप तयार झाले. देसाईचा समानार्थी शब्द आहे 'देशमुख'. कोकणात देशमुखांना देसाई म्हटले जात असे. देसाई हे विशेषकरून ब्राह्मण असत.

कर्नाटकात देखील 'देसाई' या नावाचा अधिकारी होता. त्यासोबत 'नाडगौडा' या शब्दाचाही उपयोग केला जात असे. एका प्राचीन पत्रात या दोनही शब्दांचा उपयोग करण्यात आला आहे, तो असा "श्रीनिवास वेंकटाद्री हे गदग परगण्याचे देसाई व नाडगौडाहि आहेत". या ठिकाणी 'नाड-गौडां'चा अर्थ किल्लेदार असा होतो. परंतु धारवाड मध्ये देसायांना 'नाडगौडा' म्हटले जात असे. कोकणात देसायांजवळ 'प्रभु' पद राहत असे. म्हणून या दोन पदांच्या स्वामीला प्रभुदेसाई म्हणत. आज पण 'प्रभुदेसाई' हे एक आडनाव आहे. विदर्भ, खानदेश आदी भागांत 'देसायां'ना 'देशमुख' म्हणत. देसायांची कार्ये व अधिकार देशमुखांसारखेच असत.

सरदेसाई

'देसाई'च्या वर 'सरदेसाई' नावाचा अधिकारी असे व तो सर्व देसायांचा वरिष्ठ अधिकारी असे. सरदेसायाची नियुक्ति रियासत वा पेशव्यांकडून केली जात असे. देसाई शेतसारा वसूल करून सरदेसायाला देत असे. आणि सरदेसाई राज्याकडे तो वसुल देऊन टाकत असे. अशाप्रकारे सरदेसाई हा राज्य व देसाई यांच्यातील दुवा होता. ग्रामीण भागातील जनता ही देसायांच्या प्रभावाच्या अंतर्गत असे आणि देसाई हा एक स्वतंत्र जननायक असे. सरदेसायांच्या माध्यमाने राज्य जोडलेले होते.

या विवेचनावरून हे स्पष्ट होते की, 'देसाई' व 'देशमुख' ही आडनावे ऐतिहासिक व सामाजिक जीवनाचे अंतरंग स्पष्ट करतात आणि त्यामुळे तत्कालीन राज्यव्यवस्थेचे स्वरूप लक्षात येते.

(डॉ. रामगोपाल सोनी यांच्या मूळ हिंदी लेखाचा मराठी अनुवाद श्री. अरुण पाथ्रडकर यांनी केला आहे.)

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

नीलिमा आंगले यांची बालकविता / वसंत चिंचाळकर

आज नियतीवादाचे गोडवे, ललित कथा कविता वाङमयात विशेषत्वाने चर्चेस आहेत. नेमक्या याच वेळी, नीलिमा आंगले यांची भेट झाली हेही बरेच झाले. त्यांची भेट अनायास झाली. त्यांच्या कविताही सहज वाचावयास मिळाल्या. गत-जीवनातील काही पानेही, कळत-नकळत उलटली गेलीत. आणि, माणसाला कळत-नकळत कुठल्या अनामिक दिशांना ओढून नेणारी कुणी अतर्क्य शक्ती आहेच; तिला माणूस शरण जातोच जातो, या विचारांपासून फारकत झाली. नीलिमा आंगले हिच्या कवितेशी, तिच्या काव्यानुभवाशी समंजस नाते जुळायला लागले. हा असा नव्यानेच अंकुरायला लागलेला शब्दसंवाद, सुखाचा व्हावा असाच आहे.

कवितेवर प्रेम करणाऱ्या माणसांसाठी, गोवा म्हणजे वा. भ. बोरकरांना देश. मग पाठोपाठ गोव्याचे चित्र उभे राहते ते, निसर्गरम्य परिसराचा, नारळी पोफळीचा, खळाळत्या मांडवी नदीचा आणि घनगंभीर अरबी सागराचा प्रदेश म्हणून याच परिसरात नीलिमाचा काव्यफुलोर बहरला. पण तो काही झाड-झावळींचा, सागर गाजेचा, मांडवी-बोरीचा आडोसा घेत नाही. जे सन्निध आहेत, ते सारे आपले नाहीतच, असे कुणी जराशा आगाऊपणे तिच्या कानात सांगून टाकले असावे. बाह्य सौंदर्याचा आणि विलोभनीय वनश्रीचा असा दिमाखदार खजिना वास्तवात नीलिमा आंगलेसाठी असा नव्हताच. म्हणजे ती काही 'लेडी ऑफ शेलॉट' सारखी वास्तवातून सुटून जाऊन प्रतिबिंबात मश्गूल होणारी नव्हती ! तिला वास्तवातील माणसांचे मनाई हुकूम नव्हते. कुठली तरी अतर्क्य शक्ती, तिला दूर अंतरावर थोपवून धरायचा प्रयत्न करीत होती.

सारे सौंदर्य डोळ्यांदेखत पुढे सरकलेले. हसणारे, डोलणारे, जिवंत. समुद्राच्या खळाळत्या लाटा, त्यावर प्रकाशाची रिमझिम, माडांची गाणी आणि आजूबाजूला रंगात आलेले मुलांचे खेळ हे सारे मनमोकळे पाहता यायचे. पण ते सारे कसे तासन्तास, पुळणीतील वाळूत स्वतःचे पाय गाडून घेऊन. समोरचे पाहताना नसन्नस पेटायची व उत्साहाचा प्रचंड कल्लोळ उटायचा. पाउले झुम-झुमायला यायची. पण मारे आपले, पायांना भुसभुशीत वाळूत गाडून घेऊनच. पोकळीच्या झिज्या विस्फारीत पळत जाणाऱ्या वाऱ्याची गाणी ऐकली तीही शांतपणे खिडकीनजीकच्या एका साध्या खुर्चीत बसूनच. असे सारे जिणे वाट्याला आले असताना, कुणाच्याही मनात कशी कटुता दाटून आली असती ? जीवनातील बऱ्या-वाईटांच्या झिज्या उपटीत, नियतीवर घणाघाती आघात करीत उन्मळून लिहिणे-वागणे स्वाभाविकच ठरले असते. त्यातून तिच्या मनामनातील किती-तरी गुंतागुंतीचे प्रदेश शोधायचा प्रयत्न झाला असता. पण नीलिमाचे तसे काही तिच्या कवितां-तून डोकावलेच नाही. अचानक खांद्यावर येऊन बसलेल्या पाचोळ्याला झटकून टाकावे, तसे सारे तिने दूर लोटले. अगदी सहजच. आणि ती चंद्रतारे, पशुपक्षी, फुलेपाने, पाऊसवादळ आणि पऱ्यांचा देश यातच मनमुक्त फिरायला लागली. आजूबाजूच्या मोकळ्या निसर्गाशी आणि मनात उठणाऱ्या अनंत स्पंदनांशी मैत्री केली. मग शब्दही सहजी ओठांशी आलेत. त्यांनी नीलिमा-साठी आपल्या अंतःकरणाचा खजिना मोकळा करून टाकला. त्यातील रत्ने, पाचू ती वेभानपणे वेचीत राहिली. त्यांना सुंदर कोंदणात बसविले, सजविले. त्या साऱ्यांची लोभस आणि सुबोध ओळख घडून गेली आणि साधी सरळ बालगीते अर्थपूर्ण होऊन आलीत.

त्यांना साक्षात्कार घडतो तो 'चंदाताई' आणि 'पऱ्यांचा देश' या तिच्या दोन बालगीत-

संग्रहात. 'चंदाताई' मधील कितीतरी गीते अशी आहेत, की जी थोड्याफार फरकाने मराठी घरातून पोरासोरांच्या गळ्यात असतातच. त्या बालवयाशी, आजच्या यौवनकाळीही, नीलिमाची खूप गट्टी आहे. तिच्या कवितातील सहजसाध्या अभिव्यक्तितून ती वारंवार भेटीस येत असते. 'एक होती चिऊ', 'ताईचं बाळ', 'कोकणचा राजा,' 'खेकडा' आणि 'चंदाताई. . चंदाताई. . . ' या कवितांच्या ओळी ओठांवर घोळताना तर ते विशेषत्वाने जाणवते. तिला आलेले जग पाहण्याचे वेगळे भान, रसिक वाचकांपर्यंत संक्रमित होते. खरे तर, खूप जुनी, ओळखीची वाटावीत अशी ही गीते. पण ती पुन्हा नवीन संदर्भात गाताना, आजपर्यंत पाहायचा राहून गेलेला 'दर्शन सोहळा' अवचित घडून जातो. हे असे सारे दान, नीलिमा-साठी कधी कोण घेऊन आला असावा, असाही प्रश्न उमटतो.

सामान्यत: गमतीसाठी, रंजनासाठी, हसण्या-साठी, हसविण्यासाठी आणि कुठे कुठे प्रसिद्धीच्या स्वस्त हव्यासासाठी बालगीते लिहिली जातात असा समज आहे. त्या साऱ्यांना मोडून, नीलिमा एक नवी कलाटणी तिच्या गीतातून देते. प्राणी-पक्षी यांच्या विश्वातील वेदिलीच्या आणि संग-सोबतीच्या कितीतरी कहाण्या इसापने सांगितल्या आहेत. तरीही नीलिमाने सांगितलेली कहाणी, कशी केवळ तिची आणि वेगळी वाटते. तिची 'चिऊ', आतड्याचे नाते सांगावे तशी मनभावन गाते–

काऊ म्हणाला, "चिऊ
आपण दोघं राहू
घालशील मला न्हाऊ ?
आणीन तुला खाऊ"
चिऊला नव्हता भाऊ
चिऊ म्हणाली, "काऊ
मला नाही आता
कुणाचाच वाऊ
आज पासून हो
तू माझा भाऊ"

चिमुकल्या चिऊचा हा समजूतदारपणा पाहिला की पक्षी-प्राण्यात जन्म घेऊ शकणाऱ्या नव्या नात्याची ओळख होते. आणि ते उभयतांना बिलगून असणाऱ्या कारुण्याची कोवळी किनारही दाखवून देते. तिच्या तळगर्भात शिरतांना माणूस अस्वस्थ होत जातो. कदाचित् त्यामुळेच असेल, ही 'चिऊ' माझ्या स्मरणात कायम घर करून आहे.

नीलिमाची बालगीते वाचताना अजून एक जाणवत राहिले. वाटले, नीलिमाची गीते ही वाचू नयेतच. ती नुस्ती, कुठल्या तरी गाणाऱ्या गळ्यातून झरताना ऐकत राहावीत. 'ताईचं बाळ', 'पावसा, पावसा' 'कोकणचा राजा,' 'वानरा-वानरा' आणि 'चंदाताई' ह्या गीतांचे सामूहिक गान म्हणजे कसा सुख सोहळा असेल ! लहान लहान ओठांचे झालेले चंबू, डोळ्यात हसणा-खेळणारा प्रसन्न मोकळेपणा, अंत:करणात दंग झालेले रंग पाहण्यात एक वेगळीच गंमत असते. हातवारे होताहेत, शब्द गळताहेत, वाहुल्या नाचताहेत आणि त्या तालावर अंग अंग झुलते आहे. वसंतोत्सवाच्या दिवसात फुलचुखीसाठी आलेल्या पक्ष्यांच्या किलबिलाटासारखे सारे अर्थवाही आणि प्रसन्न असेल.

ही सारी गीते अशी रसरशीत आणि जिवंत होऊन अंगणभर हुंदडताना, गायिली जाताना पाहायला, कुणालाही मन:पूर्वक आवडेल. वाटते, गीतातून अ.भव्यक्त होत जाणारी, नीलिमा आंगले, अशी शब्दापानात वंदिस्त असू नये. तिला स्वरांचे आणि सूरांचे मोकळे अंगण लाभावे. आणि हीच कलात्मक जाण, या पुस्तकांची एकूण रचना आणि मांडणी करताना देवीदास बागूल यांच्यातील सृजनशील कलावंतालाही असावी. चित्रे म्हणजे कवितेच्या कोवळ्या अंगाची, जिवंत रूपडी वाटावीत, इतकी ती शब्दांशी तादात्म्य साधून आहेत.

ही सारी सुबोधता, नीलिमाला, अशा सोज्वळ स्वरूपात कशी भेटली ? खरे तर भरारत्या यौवनात, प्रणयाची, विरहाची, उत्तुंग आशा-आकांक्षांची, दूर कुठे निरोप पोहचविण्याची, काळजातील वदलत्या रंगांची गाऱ्हाणी तिला सजवून धजवून मांडता आलीच नसती, असे नाही. आत्मकणवेतून जन्माला आलेली तऱ्हेवाईक उदासी आणि संतापोद्रेकही क्षम्य ठरला असता. पण नीलिमाच्या, मोकळ्या निळ्या आकाशात, असे

मळभ कधी दाटून आलेच नाहीत. बालांच्या निरभ्र डोळ्यात, तिला तिचे प्रतिबिंब दिसायला लागले. आणि बालकांच्या उत्सुकतेने आणि अंगाने तिची कविता जन्माला आली.

'रिकलेक्शन्स ऑफ दि पास्ट' ह्या नीलिमाच्या आत्मनिवेदनाची पाने पालटली आणि वरवर वाटणाऱ्या अनेक कोडेवजा प्रश्नांचा उलगडा झाला. गोवा-मुंबई सफर, पुण्याचे वास्तव्य, मातापित्यांचे स्नेहल छत्र आणि पणजीच्या सरकारी इस्पितळात आता डॉक्टर असलेले तेव्हाचे वर्गमित्र श्री गजानन गायतोंडे यांच्या प्रेमळ सहवासातच, नीलिमाच्या आजच्या सुबोध गीतांचा जन्म आहे, असा कुणी अंदाज बांधला तर गैर ठरेल का ? तिच्या बालगीतांतील आजची संपन्नता तिच्या प्रसन्न अंत:करणाचे प्रतिबिंब होय. भोळे कवित्व आणि निखालस सुबोधता हे या बालगीतांचे खरे सामर्थ्य आहे.

नीलिमाने चितारलेला पऱ्यांचा देशही मनोरम आहे. इथे 'सोनियांची' फुले माळणाऱ्या, पायात 'सोन्याचे तोडे' आणि अंगणात 'सोन्याचे सडे' घालणाऱ्या पऱ्यांचे गोऱ्या गोऱ्या नवरोबाशी लग्न जुळवून देणारे यक्षविश्व आहे. त्यात ती दंग आहे. 'सेरेब्रल पाल्सी' सारखा दुर्धर रोगही, ते काजळू शकला नाही. उलट अंतरीच्या, वास्तवाशी जुळू पाहणाऱ्या लाटा, बालगीतांतून कोवळ्या ओठांशी संवाद साधायला धडपडत आहेत.

चार हजार प्रेक्षकांपुढे, इचलकरंजीच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात, कविता गायनाची लाभलेली संधी आणि तिच्या कलाकृतीला बालवाङ्मय विभागाचे १९७५–७६ साली महाराष्ट्र शासनाचे लाभलेले पारितोषिक हे लौकिक आनंदाचे क्षण. पण त्या पलीकडचा नितळ आनंद आहे, तो तिची बालगीते.

अशा गीतांतून भिरभिरणारी तीही, स्वत:च कधी कुठे एखादे बालगीत होऊन जाते. तरीही वास्तवातील भले-बुरे तिला परिचयाचे आहे. त्यांच्या अस्सलपणावर तिचे प्रेम आहे. म्हणूनच वाटते, तिची गाणी बालगोपालांच्या ओठी फुलावीत. त्यांना त्यांचे रंग आणि रूप यावे. ते सारे झाले तर, अलौकिक आनंदाचे अजून एक पारितोषिक तिला लाभणार नाही का ?

⊕ ⊕ ⊕

मराठी धातूंचे वर्गीकरण

सुहासिनी लद्दू

एक भाषा दुसऱ्या परभाषिकाला शिकविताना भाषेच्या उच्चारणाच्या अंगाचा विचार जसा करावा लागतो तसाच भाषेच्या व्याकरणिक स्वरूपाचाही करावा लागतो. परभाषिकाचे भाषा शिकण्याचे उद्दिष्ट निश्चित माहीत करून घेऊन पाठांची रचना करावी लागते. ही रचना करताना परभाषिकाच्या भाषिक पूर्वज्ञानाची माहिती असणे जितके आवश्यक असते तितकेच त्याला शिकण्यासाठी मिळणारा वेळ, गृहपाठासाठी तो खर्च करू शकणारा वेळ, पाठातून व्यक्त होणारे विचार किंवा सांस्कृतिक जीवन, शिकवण्यासाठी उपलब्ध असणारी विविध साधने, शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र यांची थोडीफार ओळख इत्यादी गोष्टी भाषा-शिक्षकाच्या नजरेसमोर असणे जरूरीचे असते. लिखित स्वरूपाची मराठी भाषा परभाषिकाला शिकवू इच्छिणाऱ्या शिक्षकास उपयोगी ठरावे या हेतूने मराठी धातूंचे भिन्नभिन्न गटांत वर्गीकरण करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

'धातू' म्हणजे काळाचे प्रत्यय लागू शकणारी प्रकृतिरूपे[1]; 'रूप' म्हणजे शब्दाचा लहानात लहान अर्थयुक्त घटक; 'क्रियापद' म्हणजे 'धातु-रूपा'ला काळाचे प्रत्यय लावून तयार झालेला व वाक्यात उपयोजिला गेलेला 'विधि शब्द'[2] होय.

मराठीत काळासाठी दोन प्रकारचे प्रत्यय येतात (१) भविष्य काळाचे प्रत्यय व (२) रीतिकाळाचे प्रत्यय. या प्रत्ययांखेरीज अपूर्ण 'क्रिया दर्शक 'त', क्रियापूर्तिदर्शक 'ल'–, अपेक्षादर्शक 'व'–यांसारख्या प्रत्ययांच्या वापराने तयार झालेल्या विशेषणांचा विधिशब्द म्हणून वापर होऊन वाक्य तयार होऊ शकते. तसेच इच्छा+आज्ञा दर्शक प्रत्ययांनी युक्त विधिशब्दांनीही वाक्ये तयार होतात. 'पड' या धातूपासून, तो हा कर्ता असताना वर दर्शविलेल्या प्रत्ययांनी युक्त असे पुढील विधिशब्द प्राप्त होतील– (१) पडेल (२) पडे (३) पडतो (४) पडला (५) पडावा (६) पडो. या खेरीज आणखीही काही विधिशब्द प्राप्त होऊ शकतील उदा. पडायचा, पडता वगैरे.

धातूंचे वर्गीकरण करताना एकावेळी एकच दृष्टिकोन समोर ठेवल्यास पुढील चार प्रकारचे वर्गीकरण करता येईल.

प्रकार (१)—(विधेय दृष्ट्या) कर्ता व विधिशब्द अशा दोन शब्दांच्या लहानात लहान वाक्यात एकशब्दी विधेय पद[3] म्हणून येऊ शकणारे, ते पूर्ण धातू (उदा. पड, चाल); जे धातू अशा वाक्यात विधिशब्द असूनही विधेय पद घेऊ शकत नाहीत, ते अपूर्ण धातू. अपूर्ण धातूंना विधेय पद होण्यासाठी ज्या आणखी शब्दाची आवश्यकता असते तो शब्द 'पूरक' शब्द असेल तर, ते अपूरे धातू (उदा. आहे, नाही); व तो शब्द 'कर्म' असेल तर, ते 'सकर्मक धातू', (उदा. वाच, खा) होत.

प्रकार (२) —(प्रत्यय दृष्ट्या)— ज्या धातूंना सर्व प्रकारचे प्रत्यय लागू शकतात, ते नियमित धातू (उदा. पळ, चाल, खा); व ज्यांना काही प्रत्यय लागतात व काही लागत नाहीत, ते अनियमित धातू (उदा. ज़ा, ये, आहे) होत.

प्रकार (३)— (वर्ण बदल दृष्ट्या) ज्या– धातूंना प्रत्यय लावले जात असता त्यांच्या वर्ण लेखनात किंवा वर्ण उच्चारणात[4] काही बदल होत नाही, ते स्थिर धातू (उदा. पड, चाल); व ज्यांच्यात काही बदल होतो, ते अस्थिर धातू. ज्या अस्थिर धातूंमधील बदल दर्शविण्यासाठी विशिष्ट नियम सांगता येतो किंवा विशिष्ट गटवारीने त्यांना एकत्रित आणून नियम मांडता येतो, ते नियमयुक्त धातू (उदा. पळ, दिस); व ज्यांच्या संबंधी तसा काहींच तर्क करता येत नाही, ते नियमरहित धातू (उदा. घाल, माग) होत.

प्रकार (४)—(कर्ता दृष्ट्या)– वाक्यात क्रियापद[5] म्हणून वापरले जाताना ज्या धातूंचा कर्ता चतुर्थीच्या विभक्ति प्रत्ययाने युक्त असतो, ते

१, २, ३. पहा, मराठी संशोधन पत्रिका १९७९ विशेषणे-विधि शब्दांचा एक प्रकार — सौ. सुहासिनी लद्दू.

४. काही वर्ण (च, ज.) दन्त्य व तालव्य उच्चारणातील भेद दाखवीत नाहीत हे लक्षात घ्यावे.

५. क्रियापद — धातु + काळाचे प्रत्यय असणारा विधिशब्द.

चतुर्थी प्रधान धातू (उदा. दिस, आवड); व जे कर्ता चतुर्थी विभक्तीने युक्त नसताना येतात, ते चतुर्थीरहित धातू होत.

वरील सर्व दृष्टिकोनांचा एकत्रित विचार करून मराठी भाषेत वरचेवर वापरात येणाऱ्या धातूंचे पुढील प्रकार भिन्न भिन्न गटांत विभाजित करता येतील :–

(१) उठ — पूर्ण, नियमित, स्थिर, चतुर्थीरहित.

(२) वस — पूर्ण, नियमित, नियमयुक्त अस्थिर, चतुर्थीरहित

(३) जा — पूर्ण, अनियमित, नियमरहित अस्थिर, चतुर्थीरहित.

(४) जेव — सकर्मक (अपूर्ण), नियमित, स्थिर, चतुर्थीरहित.

(५) घाल — सकर्मक (अपूर्ण), नियमित, नियमयुक्त अस्थिर, चतुर्थीरहित.

(६) घे — सकर्मक (अपूर्ण) नियमित, अस्थिर, चतुर्थीरहित.

(७) दिस — सकर्मक (अपूर्ण) नियमित, नियमयुक्त अस्थिर, चतुर्थी प्रधान.

(८) आवड — सकर्म (अपूर्ण), नियमित, स्थिर, चतुर्थीप्रधान.

(९) (बसव) – पूर्ण नियमित, स्थिर, चतुर्थी–प्रधान.

(१०) (शक्यर्थक) ये — अपुरा (अपूर्ण) नियमित, स्थिर, चतुर्थी प्रधान.

(११) आहे — अपुरा (अपूर्ण) अनियमित, नियमरहित अस्थिर, चतुर्थीरहित.

मराठी वाक्यरचना शिकविताना एकाच गटातील धातू एकावेळी घेऊन, प्रत्येक वेळी एकाच प्रकारचे प्रत्यय यांचा वापर केला तर मराठी धातूंपुढे येणारे अनेक प्रकारचे प्रत्यय, धातूंच्या स्वरूपात पुढे येणाऱ्या प्रत्ययांपूर्वी होणाऱ्या बदलातील विविधता यांच्यामुळे होणारी दुर्बोधता काही प्रमाणात तरी कमी होईल. प्रत्येक भाषेतच सर्वसाधारण व असाधारण वर्तन करणारे 'रूपां'चे गट असतात. या दोन्ही प्रकारच्या गटातील रूपांची योग्य निवड करणे हे भाषेच्या व्याकरणिक स्वरूपाच्या अभ्यासातून ठरवावे लागते. मराठी धातूंचे वरील गट 'शिक्षकां'च्या भूमिकेला अधिक उपयुक्त व्हावेत यासाठी खालील तक्त्यात मांडले आहेत.

		अपूर्ण					अस्थिर		चतुर्थी	
	पूर्ण	सकर्मक	अपुरे	नियमित	अनियमित	स्थिर	नियमयुक्त	नियमरहित	प्रधान	रहित
(१) उठ	√			√		√				√
(२) वस	√			√			√			√
(३) जा	√				√			√		√
(४) जेव		√		√		√				√
(५) घाल		√		√			√			√
(६) घे		√		√			√	√		√
(७) दिस		√		√			√		√	
(८) आवड		√		√		√			√	
(९) बसव	√			√					√	
(१०) ये (शक्यर्थक)			√	√		√			√	
(११) आहे			√		√	√		√		√

⊕ ⊕ ⊕

'रात्रीचा दिवस' आणि संज्ञाप्रवाह / अक्षयकुमार काळे

बा. सी. मर्ढेकरांचे साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र आणि काव्य हे रसिकांचे आवडते चर्चाविषय आहेत. पण मर्ढेकरांच्या कादंबऱ्या मात्र प्रायः दुर्लक्षितच राहिल्या. प्रस्तुत लेखात त्यांच्या पहिल्या कादंबरीतील प्रयोगशीलतेचा विचार करावयाचा आहे.

मर्ढेकरांची ललित साहित्यातील प्रयोगशीलता तंत्रविषयक अपरिहार्यतेतून जन्मास आली आहे. प्रस्तुत कादंबरीतील प्रयोगशीलतेच्या समर्थनार्थ ते म्हणतात, "प्रयोगाचा उद्देश अगदी साधा आहे. तो म्हणजे एका विशिष्ट व्यक्तीच्या काही तासांच्या संज्ञाप्रवाहाचे चित्रण करणे. . . ." यासाठी मर्ढेकर संज्ञाप्रवाहाचे तीन थर गृहीत धरतात —

(१) जन्मल्यापासून मरेपर्यंत व्यक्तीचा जीवनप्रवाह हा एक संज्ञा-प्रवाह.

(२) व्यक्ति-मनाला जाणीव असणारे संज्ञाप्रवाह अर्थात जागृत संज्ञा-प्रवाह.

(३) व्यक्ति-मनाला जाणीव नसणारे किंवा असलेच तर संदिग्ध आणि दिशाभूल करणारे संज्ञा प्रवाह अर्थात अर्ध जागृत आणि सुप्त संज्ञा-प्रवाह.

मानवी जीवनातील गुंतागुंतीच्या या संज्ञाप्रवाहाचा वेध घ्यायचा असेल किंवा त्यांना शब्दरूप द्यावयाचे असेल तर शब्दांची मोडतोड वा विकृत वाक्यरचना किंवा शब्दरचना हे ओघाने आलेच.

प्रस्तुत कादंबरीचा नायक दिक्पाल, ह्याच्या जीवनातील जवळपास २४ तासांच्या गुंतागुंतीच्या संज्ञाप्रवाहाचे हे चित्रण आहे.

दिक्पालचे संध्याकाळी कामावरून घरी येणे ते झोपणे व झोपेतून उठेपर्यंतच्या दोन विभागांत संज्ञाप्रवाहांची विभागणी मर्ढेकरांनी केलेली आहे. पैकी पहिल्या विभागात जागृत संज्ञाप्रवाहाचा ओघ जबरदस्त असून दुसऱ्या विभागात अर्धजागृत आणि सुप्त संज्ञा प्रवाहाचा ओघ जास्त आहे. त्यामुळे दुसरा भाग अधिकच कल्पनाकलित आणि जड झाला आहे. पहिल्या भागाने २० पृष्ठे व्यापिली असून दुसऱ्या भागाने २४ पृष्ठे व्यापिली आहेत. शेवटची तीन पृष्ठे ध्वनित कथासूत्राची वीण जुळविण्यात खर्ची घातली आहेत. 'भारता'च्या संपादकाची कन्या हरिणी सेशाल हिच्यावरील दिक्पालचे एकतर्फी प्रेम व तिचा अचानक ठरलेला विवाह असे सामान्य कथासूत्र मर्ढेकरांनी या प्रयोगासाठी गृहीत धरले आहे.

दुसऱ्याही भागाचे पुन्हा दोन विभाग करता येणे शक्य आहे. पृष्ठ २० ते ३३ अर्धजागृत संज्ञाप्रवाह व ३५ ते ४६ सुप्त संज्ञा-प्रवाह.

पहिल्या भागातील जागृत संज्ञा प्रवाहाच्या ओघात आशयदृष्ट्या अनेक विषय आलेले आहेत. त्यातून मर्ढेकरांच्या सूक्ष्म सामाजिक चिंतनाचा आढळ होतो. अर्थात मर्ढेकरांनी या भागात पात्रांच्या द्वारे व्यक्त केलेले विचार तर्कसंगत आहेतच असे नाही व याच्या समर्थनार्थ, 'प्रचलित वादविवाद्य प्रश्नावर तर्कशुद्ध प्रकाश पाडण्याचा माझा हेतु नाही' असे मर्ढेकरांनी या कादंबरीच्या प्रस्तावनेत आधीच सांगून ठेवले आहे. मार्क्सवाद, न्याय आणि दया, मार्क्सवादाची शोकांतिका, विद्यापीठातील अनागोंदी कारभार आणि अंतर्गत भांडणे, वशिलेबाजी, Ph. D. चे प्रबंध इत्यादी अनेक विषयांवर दिक्पाल आणि मुलाम यांच्या संवादातून मर्ढेकरांनी सूचक भाष्य केले आहे व त्याचे आकलन संज्ञाप्रवाहाला अनुकूल अशा शैलीमुळे केवळ नाट्य मूल्यांनीच करणे शक्य आहे.

हा झाला आशयानुकूल भाग. अभिव्यक्ति दृष्ट्या देखील मर्ढेकरांनी कितीतरी संज्ञाप्रवाहात्मक प्रयोग या भागात केले आहेत. उदाहरणार्थ :—

(१) **एका उच्चारावरून दुसऱ्याची आठवण होणे :**

(अ) एटलु बध्धु सारु छे—तेने माटे सूं—माहे सूं—सूं—बाल्या !

(आ) कल्पनातीत आदर — नातीत आदर – ना –दर – नादार मुलं.

(इ) बुधकौशिक ऋषि – 'कऋषि' :– कृषि :– हिंदुस्थान कृषिप्रधान.

(२) **मूळ शब्द पंक्तीचे विकृतीकरण :**

(अ) कुलाव्याची दांडी गोंतास माळ.

(आ) आला तिशीत बिलंदर, त्याला नाही धिर.

(इ) पुष्पांसि जीर्णानि यथा हुंगाय.

(ई) भवाब्धिपतिता मला प्रभु तुझी कृपानाव दे.

(३) **एका प्रसंगावरून स्मृति साहचर्याने भूतकाळात शिरण्याचा प्रयत्न :**

(अ) पैलू, पैलूवरुन त्याचे खेडे, नारिंगाचे बाग – आठ वर्षांपूर्वी खाल्लेली नारिंगे.

(४) **एका शब्दरूपावरून दुसऱ्याची आठवण होणे :**

(अ) अंतःकरणाचा आंधळा, – डोळे– शंकराचा तिसरा डोळा, – लेखकाचा तिसरा डोळा

(आ) मला निवडून तर – निवडुंगाचे कुंपण – इत्यादी.

दुसऱ्या विभागातील अर्धजागृत संज्ञाप्रवाहाच्या ओघात अनेक विषयांची, मानसिक गुंतागुंतींची गुंफण मर्ढेकरांनी केली आहे. पहिल्या विभागात वापरलेली मानसिक साहचर्य-संगती बरीचशी सुसंगत आहे तर दुसऱ्या विभागात हीच संगती बरीचशी विस्कळीत झाली आहे; नव्हे ती मर्ढेकरांनी मुद्दामच विस्कळीत केली आहे व याच विभागात संवेदनांची जाणीव विकृत केल्यामुळे नारिंगी समुद्र, जांभळी लव्हाळी, हिरवे तारे, सूर्याचे हिरवे किरण, पिवळा केस, हिरवे शिंपले अशा दृक् संवेदना वेगळ्या स्तरावर प्रकट झाल्या आहेत. त्याचप्रमाणे नाद संवेदनांमध्ये स्थित्यंतर झाले आहे. उदाहरणार्थ— गापला गत्यंत गाभारी आहे, किंवा, 'म्हाफ म्हरा म्हणजे म्हशीला म्हैल म्हाला म्हणेन', किंवा, 'सुमनरतेच्या सुदनावरचे दुव बुंघुनि च्यावे, हरि के राणी गार पाउनी गावी उस खावे'.

दुसऱ्या भागातील उत्तरार्धात, सुप्त संज्ञा-प्रवाहातील मानसिक साहचर्य-संगती अनेक विषयांना स्पर्श करणारी असली तरी पुष्कळच सुसंगत आहे. यंत्रयुगाने आणलेल्या दुष्परिणामांची ललित चिकित्सा, साम्यवादी देशात साम्यवादामुळे आलेली यंत्रसापेक्ष समाजरचना आणि तिच्यातील जिव्हाळा-विरहित यंत्रसन्मुखता इत्यादी विषयांना ती स्पर्श करते. सूचित कथासूत्राचा बंधही या भागात जुळवून घेण्याचा प्रयत्न मर्ढेकरांनी केला आहे. संज्ञा-प्रवाहाचे प्रतिबिंब जागोजाग पाडण्याच्या प्रयत्नांत मर्ढेकरांनी संपूर्ण कादंबरीत कुठेच कसूर केली नाही. "प्रस्तुत लिखाण हे फक्त प्रयोगात्मकच असल्यामुळे तसा प्रयत्न अट्टाहासाने व सातत्याने न करता केवळ गालावर तीट असावी या दृष्टीनेच मी काही ठिकाणी केला आहे" अशी मल्लिनाथी मर्ढेकरांनी केली असली तरी संज्ञा-प्रवाहाच्या प्रकटीकरणाचा अतिरेकीपणा त्यांच्या संपूर्ण कादंबरीतून जाणवतो.

मर्ढेकर पूर्व कादंबरीत आलेला कथानकाचा साचेबंदपणा, आशयाची तीच वीण, स्थिरपद झालेली नायक-संकल्पना व नेटकी, सुबक पण कृत्रिम शब्दरचना याविरुद्ध मर्ढेकरांनी आपल्या या पहिल्या कादंबरीद्वारा आघाडी उघडली पण मर्ढेकरांच्या दुर्दैवाने ही प्रयोगात्मक कादंबरी लिहून ते काहीही साधू शकले नाहीत. याचे कारण मर्ढेकरांनी ही कादंबरी लिहितांना आपली दृष्टी पूर्णपणे प्रायोगिकच ठेवली. काव्याच्या दृष्टीने प्रयोग करीत असताना मर्ढेकरांचे आशयाकडे दुर्लक्ष झाले नाही म्हणून मराठी काव्याची साचलेली गंगा निर्मळ करण्याचे भाग्य जसे मर्ढेकरांना लाभले तसे या कादंबरीच्या बाबतीत झाले नाही.

मर्ढेकर पूर्व मराठी कादंबरी ज्या संथ गतीने वाहत होती तिचे स्वरूप खळबळून टाकण्याचे श्रेय मर्ढेकरांना लाभले नाही व त्यांच्या कादंबरीचे मूल्य पुस्तकी प्रयोगापुरतेच मर्यादित राहिले. मराठी कादंबरी आकृती आणि भाषादृष्ट्या ज्या

अनुक्रमणिका

एकाच आवर्तनात मर्ढेकरांच्या काळी गोते खात होती तिला समर्थ आशयाची जोड देणे आवश्यक होते. पण जो युद्धजन्य आंतरराष्ट्रीय आणि सामाजिक आशय त्यांच्या काव्याला लाभला त्याचे केवळ आभासच या कादंबरीला निरखिता आले.

मर्ढेकरांची प्रायोगिक कादंबरी फसण्याचे कारण त्यांच्या कादंबरी–लेखनाच्या प्रेरणा बाह्य वास्तावावर आणि पाश्चात्य वाङ्मय-प्रयोगांवर आधारलेल्या होत्या. क्रिस्तान लाराने निर्मिलेल्या दादा संप्रदायी (Dadaism) कवींनी व लेख-कांनी जी संज्ञाप्रवाहात्मक पद्धती पाश्चात्य वाङ्मयात आणली तिचे अनुकरण करण्याचा प्रयत्न; विशेषत: जेम्स जॉइसच्या 'युलिसिस' या कादंबरीचे तांत्रिक दृष्ट्या अनुकरण करण्याचा प्रयत्न मर्ढेकरांनी केला पण तो यशस्वी होऊ शकला नाही. या उलट पाश्चात्य कवींच्या प्रेरणा पचवून आंतरिक प्रेरणेने समृद्ध असलेल्या त्यांच्या काव्याने मराठी कवितेला ऐतिहासिक दृष्टी दिली.

⊕ ⊕ ⊕

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० (अ) प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार, दि. २९–७–७९ ला दुपारी ४ वाजता नागपूर येथे केंद्रिय कार्यालयात भरेल.

सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक साधारण सभेचा अहवाल.
२. गत वर्षाचे कार्यवृत्त.
३. १९७८–७९ सालचे हिशेब तपासनीसाकडून तपासून घेतलेले हिशेब.
४. पुढील (१९७९–८०) वर्षाचे अंदाजपत्रक.
५. १९७९–८० करिता अधिकृत (चार्टर्ड) हिशेब तपासनीसाची नेमणूक.
६. निवडणुकी बाबतच्या तक्रारींचा विचार करुन निकाल देण्यासाठी लवादाची नियुक्ती (घटना नियम १२ औ प्रमाणे).
७. अध्यक्षांच्या अनुमतीने येणारे अन्य विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व तिला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

संघाच्या साधारण सभेत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी पूर्वसूचना सभासदाने सभेपूर्वी चार दिवस अगोदर कार्यालयाकडे दिली पाहिजे.

ह्या सभेला सर्व सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

विशेष सूचना :—घटना कलम ९ (इ) अन्वये सभासद होऊन बारा महिने न झालेल्या नव्या सभासदास मताधिकार राहणार नाही.

नागपूर.
दि. ३०–५–७९

गो. स. वेहाडराय,
सरचिटणीस,

अखेरची कादंबरी / श्रीनिवास रामचंद्र सिरास

कै. वि. स. खांडेकर यांची 'सोनेरी स्वप्ने भंगलेली' आणि कै. ग. त्र्यं. माडखोलकर यांची 'अकेला' या दोन कादंबऱ्या वाचून अशी मनोमन जाणीव होऊ लागते की जेव्हा एखादा लेखक त्याच्या जीवन यात्रेच्या टोकाशी येऊन पोहचतो तेव्हा त्याच्यात झालेल्या उत्क्रांतीचे सबंध दर्शन त्याच्या अखेरच्या कादंबरीत अभ्यासकाला सहजतेने घडते. उपरोक्त दोन्हीही कादंबऱ्या अनुक्रमे खांडेकर व माडखोलकर यांनी लिहिलेल्या अखेरच्या कादंबऱ्या आहेत. श्री. वि. स. खांडेकर यांच्याबद्दल श्री. ग. त्र्यं. माडखोलकर जे काही लिहितात त्यावरून हे स्पष्टपणे जाणवते की माडखोलकरांना खांडेकरांच्याबद्दल एक अमोल असा जिव्हाळा वाटत असावा. हे दोघेही लेखक स्वतंत्र विचारांचे होते व त्यातूनच त्यांच्या वाङ्मयाचा विशिष्ट असा स्वतंत्र आविष्कार होत राहिला. 'अकेला'चे प्रकाशन मात्र खांडेकरांच्या 'सोनेरी स्वप्ने भंगलेली' सारखे मान्यवर प्रकाशकाकडून दिमाखाने झाले नाही. उलट २०८ पृष्ठांपैकी २० पृष्ठे कोरी आणि ३९ पृष्ठे कवितांसारखी जागा कोरी सोडून व्यापलेल्या पत्रांना देऊन उरलेल्या २०८–५९=१४९ म्हणजे निव्वळ दीडशे पृष्ठांच्या या अपूर्ण कादंबरीत जास्तीत जास्त जाणवते ती खांडेकरांची अखेर. 'अकेला' विषयी माडखोलकरांच्या कुटुंबियांच्याकडून मला मिळालेल्या तोंडी माहितीनुसार भाऊसाहेब माडखोलकरांनी लिहिलेली तेवढी एकच कादंबरी अशी होती की घरातल्या कुणालाही त्या कादंबरीचे हस्तलिखित वाचण्याची इच्छा नव्हती आणि कुणी ते वाचलेही नाही. एरवी आधीच्या प्रत्येक कादंबरीत माडखोलकर आपले हस्तलिखित वाचणाऱ्यांची व बदल सुचविणाऱ्यांची नावे प्रसिद्ध करीत. 'अकेला' मध्ये हेच नेमके नाही.

लेखकाचे उतारवय, त्याला लाभत गेलेल्या यशाला लागणारी ओहोटी या सर्व गोष्टी गृहीत धरल्यावर खांडेकरांच्या कादंबरीचे नावही 'भंगलेले देऊळ' शी किती जुळते आहे हे विशेषत्वाने जाणवते. भाऊसाहेब माडखोलकरांनी 'भंगलेले देऊळ'ची सुरुवात कवी गोविंदाग्रजांच्या 'सुकले फूल न उमले जरि ते अश्रूंनी भिजले' या ओळीने केली. मात्र या ओळीआधी ते जो प्रश्न उपस्थित करतात तो बराचसा चित्य ठरतो. तो प्रश्न असा आहे, "मृत्युशय्येवर पडून स्वतःच्या गतायुष्याचे चिंतन करणे यांच्यासारख्या शिणलेल्या मनाला दुसरा कोणता विरंगुळा असू शकेल?" म्हातारा मनुष्य कदाचित विरंगुळा शोधत राहील, पण म्हातारा झालेला प्रख्यात मराठी कादंबरीकार फक्त चिंतनातच विरंगुळा मानणार नाही. तो त्यातून अशी कलाकृती उभी करील की जी एकाच वेळी त्याच्या तीव्रतर झालेल्या प्रेरणांचा उत्सर्ग व संबंध कलायुष्याचा आलेख समोर स्पष्ट उभा करील.

खांडेकर मानसन्मानांपासून मुळीच वंचित राहिले नाहीत. उलट 'ययाती' च्या स्वरूपात त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला व सर्वोच्च पदाचा सन्मान लाभला. पण त्यांची अखेरची कादंबरी मात्र ते माडखोलकरांच्या थोड्या-शाही जवळ पोहचण्या इतपत उत्तम का लिहू शकले नाहीत, हा प्रश्न संशोधकाला आव्हान देतो. 'अकेला' व 'सोनेरी स्वप्ने भंगलेली' यांच्याबद्दल असा प्रश्न उत्पन्न होण्याचे कारण आहे. साधारण-पणे आपल्या प्रत्येक कादंबरीचा लेखनकाल शेवटपर्यंत माडखोलकर देत असले तरीही खांडेकरांनी अलीकडे ती पद्धत सोडलेली होती. त्यामुळे दोन्ही कादंबरीतल्या कथानकावरून त्याचप्रमाणे त्यात येणाऱ्या दलित प्रश्नांच्या चर्चे-वरून या दोन्ही कादंबऱ्यांचा लेखनकाल मात्र एकसारखाच संभवतो. मात्र स्वतः माडखोलकरांनी जे 'अकेला' च्या रूपात लिहिले त्याला 'भाविनिक

असे नवे नाव देऊन जशी आत्मवृत्ताची अधिक गहिरी कडा निर्माण केली तशी कडा 'सोनेरी स्वप्ने भंगलेली' मध्ये खांडेकरांना आणता आलेली नाही. हे दोन्ही ग्रंथ जरी 'कादंबरी' या वाङमय प्रकारात प्रकाशकांनी घातले असले तरी त्यांची लेखन पद्धती ही कादंबरीची नाहीच. उलट याबाबतीत खांडेकरांनी वेळोवेळी उल्लेख केलेल्या अर्नेस्ट हेमिंग्वे या अमेरिकन कादंबरीकाराच्या अखेरच्या कादंबरीकडे अंगुलिनिर्देश करणे आवश्यक ठरेल. हेमिंग्वे जेव्हा मियामी या बेटावर अज्ञात-वास लाभेल या अपेक्षेने राहण्यास गेले तेव्हा तिथल्या घनदाट जंगलामधल्या एका मोठ्या बंगल्यात त्यांचे वास्तव्य होते. या बंगल्यात घडलेल्या घटनांचे जसेच्या तसे अलेखन करून एक सोपे ललित आत्मवृत्त, मात्र नावे बदलवून, अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी 'आयलंडस् इन् द स्ट्रीम' या नावाने लिहिले. ती त्यांची अखेरची कादंबरी म्हणून त्यांच्या संपूर्ण वाङमयीन यशापयशाच्या अभ्यासाची गमक ठरलेली आहे. मराठीत लेखकाला इतकी मोठी जागतिक मान्यता व प्रसिद्धी लाभत नसते हे खरेच, पण मरणशय्येवर असणाऱ्या प्रत्येकच माणसाचा आविष्कार हा त्याची सर्व कारकीर्द खऱ्या अर्थाने मोजता येण्याचा एक सुलभ मार्ग ठरला तर त्यात आश्चर्य किंवा फसवणुकीची शक्यता मानण्याची मात्र गरज उरत नाही. कारण एकेकाची अखेरची कादंबरी ही त्या त्या कादंबरी-काराची निर्मितीची अखेर असेल पण तरीही एक टप्पाच असतो—किंचित मागेपुढे झालेला, पण टप्पाच.

'भंगलेले देऊळ' सारखेच नाव खांडेकरांना सुचले. त्यांनी 'सोनेरी स्वप्नें भंगलेली' हे नाव घेतले—पण दोघांची स्वप्ने किती भिन्न आहेत. खांडेकरांनी भारतीय स्वातंत्र्य व स्वातंत्र्योत्तरच्या तीस वर्षातल्या भारतीयांची दैना बघून त्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या स्वप्नात रंगणाऱ्या एकेकाळच्या तरुण पण आजच्या वृद्धाचे भंगलेले सोनेरी स्वप्न कादंबरीचा केन्द्रबिंदू मानले. अर्थातच याही कादंबरीतली पहिली ओळ व दुसरी ओळ या दृष्टीने बारकाईने वाचण्याजोग्या आहेत :—

"चालता-चालता विसुभाऊ देसाई गांधी चौकापर्यंत आले. पण त्याचे त्यांना भान नव्हते. झोपेत चालणाऱ्या माणसासारखे ते शून्य मनाने एकेक पाऊल टाकीत होते." वृद्धापकाळातली एकी-कडे सजीव पण दुसरीकडे संवेदनाशून्य अशी जीवनावस्था रंगविण्याचे मोठेच आव्हान खांडेकरांसमोर होते. त्या अवस्थेचा उल्लेख मात्र ते फक्त 'झोपेत चालण्यासारखे' इतकाच करू शकले. कारण 'भावनिका' त्यांना अभिप्रेत नव्हती.

'अकेला' प्रसिद्ध झाली ती माडखोलकरांच्या हयातीतच. त्यामुळे 'स्वतःलाच कादंबरीत रंगविले आहे' अशी टीका माडखोलकरांना ऐकावी लागली ! उलट 'सोनेरी स्वप्ने भंगलेली' मध्ये जे विसुभाऊ देसाई हे पात्र कादंबरीच्या सुरवातीच्या वाक्यापासून भेटते ते आहेत स्वतः भाऊसाहेब खांडेकर. कारण या विसुभाऊ देसाईचे सगळेच व्यवहार, खांडेकरांनी प्रथमपुरुषी एकवचनाच्या सहाय्याने स्वतःला जोडून टाकलेत. विसुभाऊ सेवानिवृत्त शिक्षक, त्यांचे सकाळी-सायंकाळी फिरायला जाणे, कातळावर बसून त्यांच्याशी भावनिक संपर्क साधणे इत्यादी प्रसंग त्यांच्याच वर्तनाशी साम्यीभूत असे आहेत. कादंबरीतले विसुभाऊ आपले दिवसभराचे गांजलेले मन घेऊन त्या कातळावर येतात तेव्हा त्यांचे उतारवयातले दुःख आपोआप हलके होते. ते घरी परततात तेव्हा त्यांची आजारी पत्नी त्यांच्या परतण्याची वाट बघत असते. मग विसु-भाऊ थोडावेळ तिच्याशी गप्पा करतात, मग जेवून किंवा कधी न जेवूनच ते झोपतात. पण झोप येत नाही—सोनेरी स्वप्ने भंगलेली असतात. म्हाताऱ्या वयातली सारी सारी शांती त्या भंगलेल्या स्वप्नांचे मनोरे नष्ट करून टाकतात. खरे पाहाता कोणाच्याही वृद्धापकाळातले हे एक साधे 'रुटीन' बनलेले चित्र. पण खांडेकरांनी त्या चित्राची आत्मकथा होऊ दिली नाही. इथे त्यांनी हेमिंग्वे चा मार्ग तुच्छ लेखला नाही तर फक्त नवा मार्ग चोखाळला.

या वेगळ्या मार्गाची गरज अर्थातच आत्म-वृत्त न घडवता नवे कथानक सांगेल अशी कादंबरी देणे ही होती. मात्र ते होऊ शकले नाही. कारण

खांडेकरांनी इथे विवाह समस्या, मद्यपान, स्त्रीसंभोग, अतिरेकी व्यभिचार, शालेय शिक्षणाची दुश्चित अवस्था, शाळांचे कारभार व स्वतंत्र भारताचे भ्रष्ट राजकारण या साऱ्या मुद्यांना पुढे आणणारी पात्रे तेवढी आणली. त्या त्या चित्रांची ती ती चित्रकथा बनली. विसुभाऊंची नात विजया व नातू राजू ही त्यांच्या जुन्या कादंबरीत सापडणारी बालपात्रे ठरतील पण इथे विजया समाज सेविका बनवलेली आहे. विसुभाऊ देसाई यांना दोन मुलेही आहेत. त्यांतला एक अरविंद हा तर घर सोडून अज्ञातवासात राहातो व दुसरा मुकुंदा मात्र स्वतःच्या दारु पिण्याच्या अतिरेकी व्यसनापायी आपण होऊनच आपल्या वडिलांपासून दुरावला गेला आहे. इथे 'ययाती' या कादंबरीच्या नायकाची व त्यानिमित्ताने त्यामध्ये केल्या गेलेल्या मद्यपानाच्या इष्टानिष्टतेच्या चर्चेची सहज आठवण झाल्याशिवाय राहात नाही. 'ययाती' चा नायक स्वतः इंद्रप्रस्थाचा स्वामी व राज्यपदारूढ झालेला ऐतिहासिक अधिकारी पुरुष आहे तर मुकुंद हा फक्त श्रीमंत पण मोठ्या अधिकारपदावरचा अधिकारी व तोही वर्तमान काळातला पुरुष आहे. पण ययाती जेव्हा आपल्या मद्याच्या आसक्तीचे पुनः पुन्हा केविलवाणे प्रदर्शन करतो तेव्हा त्या मद्यपानाला खरा विरोध देवयानीचा नाही तर गांधीजी व गांधीजींच्या मताने प्रेरित झालेल्या लेखकाचाच विरोध आहे, हे बारकाईने कादंबरी वाचली तर जाणवते. केवळ शुक्राचार्यांच्या मद्यप्राशनाने त्यांच्यावर मरण ओढवले म्हणून देवयानी मद्याचा तिटकारा करते हे फक्त मानायला सोपे आहे; प्रत्यक्षात ते सिद्ध करता येत नाही. मात्र अखेरच्या या कादंबरीत 'ययाती' सारखा विसुभाऊ देसाईंचा मुलगा वागत नाही. तो आपल्या मद्यप्राशनाच्या अतिरेकाचे कारण शोधतो–सोसायटी. मुंबई, दिल्ली, कलकत्ता अशा महानगरात, मोठ्या कारखानदारांच्या हाती मोठ्या पगारावर काम करणारा सगळा सेवक वर्ग फॅशन म्हणूनच मद्यप्राशन करतो हे त्याचे स्पष्टीकरण आहे. पण ते 'ययाती' ने केलेल्या स्पष्टीकरणाहूनही अधिक लंगडे पडते. कारण खांडेकरांनी फक्त मद्यप्राशनाची कहाणीच काय ती लिहिली, एक कयास तेवढा त्यांनी बांधला—त्या खोडीशी ते दुरूनही समरस व्हायला धजले नाहीत. सगळेच सांगतात मग हे मोठे पगारदार नक्कीच पीत असतील की ! अशा सारखी ही जी 'सोनेरी स्वप्ने' स्वतःच लेखकाने निर्मितीपूर्वीपासूनची बाळगलेली असतात तीच त्यांच्या कलाकृतीवरच्या आघाताचे कारण ठरतात. म्हणूनच त्यापुढे 'अकेला' मधील भाऊराव "माझी सायंपानाची वेळ झाली आहे" असे स्पष्ट लिहिणारा वृद्ध लेखक नायक व त्याचा लेखनिक हे दोघेही जास्ती उच्च कलात्मक पातळी गाठतात. लांबच लांब अलंकारिक पत्रे लिहिणारी ही सर्व मंडळी आपल्या देशात जे चांगले घडणे अशक्यच असेल त्याचीच काय तेवढी उजळणी करतात—यातून त्यांचे भटकलेपण जास्ती उघडे होत जाते. उलट कित्येक जागी खांडेकरांची कादंबरी लेखक म्हणून अखेर झाल्याचे जसे जाणवते तसे 'अकेला' वाचताना जाणवत नाही.

'ययाती' मधल्या यतीच्या पात्रासारखाच एक संन्यासी याही कादंबरीत आला आहे. पण त्या पात्राला महत्वाचे स्थान खांडेकर देऊ शकले नाहीत. कारण त्या त्या मुद्याला अनुसरूनच खांडेकरांनी पात्रे आणली. त्यांच्या जवळ वा दूर येण्या-जाण्यावर त्यांचे मग काहीही नियंत्रण राहिले नाही-म्हणूनच मुंबईत नोकरीवरून काढताच मुकुंदा एकदम कलकत्त्याला गेला व अर्थातच तिथे त्याला त्याचा भाऊ अरविंद टॅक्सी ड्रायव्हरच्या रूपात भेटू शकला; किंवा शेवटी या अरविंद बद्दलच्या अपेक्षांनीच आपण त्याची हानी करून टाकली असे नानांना वाटणे असे अतर्क्य घडलेले आढळते. म्हाताऱ्या झालेल्या विसुभाऊंची मनाची कणखरता खांडेकर रंगवू शकले नाहीत. कारण ते स्वतःच मुळात अबोल, हट्टी, दुराग्रही, दीर्घद्वेषी, मनस्तापी वृत्तीचे नव्हते असे म्हणून खांडेकरांचे अपयश झाकणे सोपे आहे. मात्र त्याने 'अखेरची कादंबरी' तटस्थ वाङमयीन मूल्यमापनापासून वंचित राहाते त्याचे काय ?

⊕ ⊕ ⊕

'वेदनेचा वेध' : एक परिचय / रजनी कोलारकर

वेदनेचा वेध : खानोलकरांची कादंबरी—'एक आकलन', या प्रा. म. गं. नातू यांनी लिहिलेल्या पुस्तकाचा हा अल्प परिचय.

प्रत्येक प्राणिमात्रावर प्रेम करणारा, प्रत्येकालाच अत्यंत आपुलकीने वागणूक देणारा स्वभाव घेऊनच जन्माला आलेल्या नातूबाई चिं. त्र्यं. खानोलकरांकडे, त्यांच्या कादंबरीतील लहान-मोठ्या पात्रांकडे, त्यातील घटनांकडेही आत्यंतिक जिव्हाळ्याने, हळुवारपणे बघताना दिसतात.

'आरती प्रभू' म्हणून ज्यांनी 'नक्षत्रांचे देणे', रसिकांना दिले त्याच खानोलकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून मात्र अत्यंत भीषण, बीभत्स असे जगाचे स्वरूप वाचकांना दाखवले. खानोलकरांच्या कादंबऱ्या वाचताना इतकी किळसवाणी पात्रे या पृथ्वीतलावर खरेच असतील का, असा प्रश्न मनात कायम घर करून बसतो. 'रात्र काळी. . . .', मधील लक्ष्मी तर केवळ जुगुप्सा उत्पन्न करते. 'अजगर' ही सुद्धा विवाद्य ठरलेली ओंगळ, विकृत कृतीच. त्यांची 'कोंडुरा'च काय ती मनात भरते. अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया खानोलकरांच्या कादंबरी बाबत सर्वत्र ऐकू येत असे. (त्यात बरेचसे तथ्यही होते असे वाटते.)

परन्तु नातूबाई त्यांच्या वेगळ्याच दृष्टीने खानोलकरांना न्याहाळतात. 'वेदनेचा वेध' या पुस्तकातून खानोलकरांच्या पात्रांची विकृती शोधण्यांचे, त्यातून भरदार निष्कर्ष काढून विद्वानांनाही धक्का देण्याचे, त्यांना पुन्हा एकदा विचार करायला लावण्याचे सफल असे काम नातूबाई करून जातात. प्रस्तुत पुस्तकातून खानोलकरांच्या प्रत्येक कादंबरीचे अत्यंत विश्लेषणात्मक परीक्षण करून त्यांनी कादंबऱ्यांतील पात्र व घटना समजावून सांगून खानोलकरांच्या वेदनेशी त्याची सुसंगती लावून दिली आहे. हे करीत असताना म. गं. नातूंची आगळी-वेगळी अशी काव्यमय, विश्लेषणात्मक पण ललित-रूप धारण करणारी समीक्षेची शैली दिसून येते. प्रस्तावनेपासून तो शेवटापर्यंत खानोलकरांची किमया रसिकांच्या मन:पटलावर उतरविण्याचा प्रयत्न त्या करतांना दिसतात.

कादंबरीचे परीक्षण करताना प्रत्येक परीक्षणाला त्यांना पूर्णपणे पटलेले असे शीर्षक त्या देतात. या शीर्षकांवरूनच नातूबाईंना लागलेल्या वेगळ्या वेधाची व आगळ्या शोधाची वाचकांना चटकन कल्पना येते. कादंबरीतील सूक्ष्मतर घटना व स्वभाव वैचित्र्ये त्या समजावून सांगतात.

'रात्र काळी. ' त त्या 'अनोखे दु:ख' शोधतात. या कादंबरीतील प्रमुख पात्र लक्ष्मी ही आदिमवासनेचे प्रतीक तर दाऱ्या, वामन, दाजी. . .', इत्यादी पुरुषी आसक्तीची प्रतीके असावीत. पुरुष-प्रकृतीचा हा खेळ प्रतीकरूपात बद्ध करून विषयवासनेची आदिमरूपे खानोलकर मूर्त करीत असावेत असा नातूबाई अंदाज बांधतात. "या कादंबरीतील सारीच वर्णने अतिशय प्रत्यय-कारी, काळजाला जाऊन भिडणारी असली तरी ती लक्ष्मीच्या अतिरेकाची—सर्वच पुरुषांनी तिच्यापुढे नांगी टाकण्याची,. . .इत्यादींची उकल करू शकत नाहीत. म्हणूनच घराबाहेर पडल्या नंतरची लक्ष्मीची सारी वर्णने 'लक्ष्मी' ची नसून ती निव्वळ वासनेची आहेत" अशी एक संगती नातू-बाई लावतात.

खानोलकरांची दुसरी गाजलेली कादंबरी 'अजगर'. ह्या कादंबरीची विकृत, ओंगळ, अश्लील अशीं जी संभावना रसिकांनी केली ती नातूबाईंना मान्य नाही. "ही कादंबरी एक अनाकलनीय गूढ आहे. सामान्य वाचकांना तर आटोक्या बाहेरची आहे" असे नमूद करून त्या या

कादंबरीचा त्यांचा शोध वाचकांपुढे मांडतात. या कादंबरीत त्या 'नेणिवेचा शोध' घेतात. "कादंबरीतील पात्रे मनावरील जाणिवेची आवरणे फेकून नेणिवेचे दर्शन घडवितात. त्यामुळेच त्यांच्या प्रकृतीचे विकृतीत रूपांतर होते. . .भविष्याच्या पोटात काय काय दडले असेल याचा जसा माणसाला थांगपत्ता नसतो तसाच त्याच्या जाणिवेखाली दडलेल्या नेणिवेच्या हालचालींचाही मागमूस त्याला नसतो. म्हणून एखादा कलावंत जेव्हा त्या हालचालींचे दर्शन घडवितो तेव्हा वाचकाला ते असंभाव्य, चमत्कारिक व भयावह वाटते. असंज्ञ मनावर सभ्यतेची, संस्कृतीची पुटे चढलेली नसल्यामुळे मनाचा तळ दिसू लागतो, त्याचे खरे-खुरे रूप पाहणे शक्य होते. पण हे सत्य दर्शन अपरिचित व कटु असल्यामुळे त्याकडे पाहण्याची बहुतेकांना हिंमत नसते. म्हणून या मनाचा वेध घेऊ पाहणाऱ्या कलाकृती त्यांना अप्रिय वाटतात. प्रस्तुत कादंबरी अशाच प्रकारची आहे.", असे निवेदन त्या सुरूवातीसच देतात. खानोलकरांच्या 'रात्र काळी. . .' व 'अजगर' मधील सगळीच पात्रे विक्षिप्त का, विकृत का ? हा वाचकांना पडणारा प्रश्न. त्यावर नातूबाईंचे उत्तर असे की या कादंबऱ्यांतून खानोलकरांना त्याच धरावरील अनुभव रेखाटावयाचा होता म्हणून !

'कोंडुरा' ही अत्यंत गाजलेली व रसिक-मान्य कादंबरी साहित्याचा मानदंड ठरावा असे सांगून कादंबरीतील पात्रांचा व आशयाचा त्या शोध घेतात. त्यांना यात 'श्रद्धा आणि विवेक' यांची भीषण लढत सापडते. 'कोंडुरा' या कादंबरीचे अत्यंत विस्तृत विवेचन व विश्लेषण करून नातूबाई खानोलकरांना दाद देतात ती अशी : "निर्जीव अशा कोंडुऱ्याला सर्वशक्तिमान समजून त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवणाऱ्या सुतारीण व अनुसूया या दोषी कशा ? अतिक्रूर, स्वार्थी, लंपट व पापी असूनही नरोबा देवाची पूजा करायला धजावतो कसा ? देवही त्याची पूजा कशी स्वीकारतो ? नारोबा इतक्या ऐश्वर्यात कसा राहू शकतो ? की देव, पाप, पुण्य या साऱ्या निव्वळ कल्पनाच ? अदृश्य शक्तीचे वैयर्थ्य जाणवून देणारे हे प्रश्न खानोलकरांनी इतक्या कलात्मक पद्धतीने सुचविले आहेत की ते असे वेगळे काढणे म्हणजे कलाकृतीस घायाळ करणेच ठरावे. हाच या कादंबरीचा मोठेपणा."

यानंतर 'अस्तित्ववादी' कादंबरी म्हणून जिची ख्याती आहे अशी 'त्रिशंकू' नातूबाई हाताळतात. 'विवेक माझा सांगाती' म्हणून त्यांनी त्रिशंकूच्या चिकित्सेला शीर्षक दिलेले आहे. कादंबरी अस्तित्ववादी आहे म्हणूनच त्या या अस्तित्ववादाची दि. के. बेडेकर व खुद्द खानोलकर यांच्या लेखाद्वारे वाचकांना ओळख करून देतात.

'त्रिशंकू' ही कादंबरी दोन विभागात विभागल्याने एकसंधता राखली गेली नाही व कलाकृती सदोष झाली. तसेच डिटेक्टिव्ह साकुंळेमुळे ती रहस्य कथेकडे सरकली इत्यादी या कादंबरीवरील आरोपांचा व्यवस्थित समाचार नातूबाई घेताना दिसतात. त्यांनी आरोपांचे जोरदार खंडन केले आहे व खानोलकरांची त्याबाबतची भूमिका वाचकांना सादर करण्यात त्या बऱ्याच यशस्वी झाल्या आहेत असे म्हणावेसे वाटते. "या कादंबरीत खानोलकर मानवी अस्तित्वाच्या अर्थाचा वेध घेत आहेत व हा वेध घेताना लोकमानसात अतिपवित्र म्हणून दृढमूल झालेल्या देव, धर्म, आई, वडील, घर, शील, देश, इत्यादी मूल्यांची तळस्पर्शी चिकित्सा करून त्यांचे वैयर्थ्य ते जाणवून देतात," हे नातूबाईंचे मत.

यानंतर 'गंगुराया'—('सृजनास धास्तावलेले मन—) 'चानी' –(सुन्न करणारी शोकान्तिका) या कादंबऱ्यांतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा उहापोह त्या त्यांच्या काव्यात्म शैलीने व दमदार आणि भरदार विचारांनी करतात. 'दगडात देव पाहणाऱ्या व सर्व जगाला मानवतेचे धडे देण्याचे सामर्थ्य असल्याचा दावा करणाऱ्या धर्मात "चानी" सारख्या किती जीवांची हत्या केली जाते' ? या प्रश्नाने खानोलकर कसे व्याकुळ होतात ते नातूबाईंनी वाचकांना जाणवून दिले आहे. "खानोलकर प्रत्येक कठोर सत्याची प्रतीती चानी-तून देतात. अंधश्रद्धेपायीं उभा गाव निरपराध

असहाय व छोट्या चानीवर सर्वसामर्थ्यांनीशी तुटून पडू शकतो, तिला तुडवू शकतो. या घटनेतून आपल्या विवेकशक्तीला केवढी घोर निद्रा लागलेली आहे हेच खानोलकर आपल्याला दाखवतात". असा अभिप्राय त्या देतात.

'अज्ञात कबुतरे', 'अगोचर', 'पाषाणपल्लवी' या कादंबऱ्यांचेही विस्तृत समालोचन नातूबाई करतात. विषयासक्त मनांनी स्त्रीवर केलेले अत्याचार, वासनांच्या अतृप्तीने स्त्रीमनांची होणारी तगमग व दुर्दशा. त्यातून जाणवणारी 'वासनेची अतिरेकी असोशी' व त्यामुळे खानोलकरांना होणाऱ्या वेदना. त्या वेदनांचा वेध नातूबाई एक एक व्यक्तिरेखा उलगडून आपल्यापुढे ठेवतात.

म. गं. नातूंना सारेच खानोलकर पूर्ण पणे पटलेले दिसतात. त्या स्वतः .खानोलकरांच्या इतक्याच त्यांच्या पात्रात, त्या पात्रांच्या दुःखात, वेदनेत हुंबलेल्या जाणवतात.

खानोलकरांचे त्यांना भासणारे आगळे-वेगळे रूप 'खानोलकर : एक किमयागार' या प्रदीर्घ निबंधातून वाचकांपुढे ठेवतात. खानोलकरांचे वाङमय निश्चित चिरंतन होईल, अक्षर होईल याची पक्की खात्री त्या बाळगून आहे तसे दिसते. असे असताना सुद्धा खानोलकरांचे कच्चे दुवे त्या सांगायला त्या विसरत नाहीत.

'अगोचर' या कादंबरीबाबत त्या म्हणतात, "...मलपृष्ठावर खानोलकरांची, प्रतिभा जे एक तपापासून शोधत होती ते अखेरीस इथे पूर्णांशाने प्रगट झाले आहे–अशी या कादंबरीची भलावण केलेली आहे, पण मला वाटते खानोलकर आज पर्यंत जे शोधत होते ते त्यांच्या हातून येथे पूर्ण निसटले आहे."

तसेच 'पाषाण पल्लवी' बाबत त्यांचे मत असे आहे "वास्तविक पाप, पुण्य, परंपरा इत्यादी कल्पनांचा मूलगामी विचार करू पाहणाऱ्या या कादंबरीचा आवाका फार मोठा होता. पण खानोलकरांना शारीरिक स्वास्थ्य व सवड पुरेशी मिळाली नसावी. म्हणून अवघ्या १७२ पृष्ठात त्यांनी तो जबरदस्तीने कोंबून बसवला असेल. शिवाय कथानकाचा ठिसूळ पाया, नायिकेचे गैर-वाजवी उदात्तीकरण, तिच्या संभोगाची व उन्मादाची अकारण उघडी वाघडी वर्णने इत्यादी दोषांमुळे एक चांगला विषय वाया गेला."

" .खानोलकर जेव्हा एखाद्या वृत्तीचे निखळ दर्शन घडविण्यासाठी पात्रांची योजना करतात, तेव्हा मात्र त्यातून त्या त्या वृत्तीचे दर्शन घडत असले तरी त्या पात्रांवर अन्याय होतो. ती केवळ साधने बनतात.. "

खानोलकरांचे असे हे तुरळक कच्चे दुवे दाखवून त्या खानोलकरांच्या उत्कृष्ट काव्यात्म शैलीचे, त्यांच्या प्रतिमावैभवांचं, आशयाच्या सघनतेचे व ते प्रभावीपणे मूर्त करणाऱ्या विलक्षण सामर्थ्याचे कौतुक करताना म्हणतात. वेदने-लाही सुंदर रूप देणारे खानोलकरांचे प्रतिमाविश्व न्यारे आहे. .ठिबकत्या रक्तासारखी स्त्रीची वेदना पाहताना त्याची लाली व लयही, ते जाणवून देतात."

खानोलकरांचे हे सामर्थ्य बघताना हिणाचेही सुवर्ण करणाऱ्या किमयागाराची त्यांना आठवण होते.

" ..आपल्या प्रतिभेचा रसिकांवर मुक्त वर्षाव करणाऱ्या, 'एकेका क्षणाचे मोगरे' करणाऱ्या स्वतः दुःखात राहून दुसऱ्यांना सुखविणाऱ्या" खानोलकरांचे स्मरण करून त्या या ग्रंथाचा शेवट करतात.

अशा विस्तृत व रसाळ विवेचनाद्वारे एका कादंबरीचा आकार घेईल एवढे स्वरूप 'वेदनेच्या वेधाला' आले आहे. हे विवेचन सामान्यांना (कादंबऱ्या समजून घ्यायला) व अभ्यासकांना एका विशिष्ट विचारांची दिशा दाखवणारे, चालना देणारे ठरेल हे निःसंशय.

म. गं. नातू,
'वेदनेचा वेध', मूल्य १५ रुपये.
पृष्ठे १७२
अभिनव प्रकाशन, मुंबई–१४.

⊕ ⊕ ⊕

'नाथ संप्रदाय–एक सांस्कृतिक विचार' / द. ह. अग्निहोत्री

'नवनाथ भक्तिसार' हा मराठी ग्रंथ मी वाचला आहे. तो केवळ नाथपंथीय सिद्धांच्या चमत्कारांचा संग्रह आहे. आजच्या वैज्ञानिक युगात या चमत्कारांवर कोण विश्वास ठेवील ? पण 'नाथसंप्रदाय एक सांस्कृतिक विचार', हा ग्रंथ, अनेक हिंदी, मराठी व इंग्रजी ग्रंथांच्या शोध-आधारे लिहिला असल्यामुळे त्याचे मूल्य आगळे आहे. याच्या वाचनाने या संप्रदायाची पुष्कळ विश्वासनीय माहिती वाचकाला कळते.

इ. स. च्या १० व्या शतकाच्या सुमारास तत्कालीन प्रचलित धर्मांना व धर्मपंथांना ग्लानी येऊन भ्रष्टाचार व अनाचार कसा व किती बोकाळला होता याची सविस्तर हकीकत या पुस्तकात आली आहे. त्या काळी समाज ऐहिक सुख-विलासाकडे पराकोटीचा आकर्षित झाला होता. त्यामुळे एक प्रकारचा गोंधळ माजला होता व कोणताच धर्म किंवा पंथ समाज-धारणा करण्यास समर्थ नव्हता.

नाथसंप्रदाय हा भारतात पूर्वीपासून अस्तित्वात असलेला शैव संप्रदायच आहे. इ. सनाच्या ११ व्या शतकात गोरक्षांनी त्याला व्यवस्थित स्वरूप दिले. तत्कालीन इतर धर्मांतील वाईट गोष्टी कटाक्षाने टाळून हितकर गोष्टी तेवढया घेतल्या व त्यातील काहींवर भर दिला. कर्मकांड, मूर्तिपूजा, उत्सव, तीर्थयात्रा, धर्माच्या नावावर हिंसा, मद्यपान, मांसाशन, इतर अनाचार, स्त्रियांना संन्यास-दीक्षा, शून्यवाद, द्वैतवाद इ. गोष्टी गोरक्षांनी टाळल्या. योगसाधनेने जीवशिवऐक्य साधावे या गोष्टींवर त्यांनी भर दिला, योगसाधना म्हटली की इंद्रिये, मन व प्राण यांचे नियमन आले. व त्यासाठी गुरू करण्यावर भर या गोष्टी गोरक्षांना महत्त्वाच्या वाटल्या.

गोरक्षांना नुसते धर्माचे स्वरूपच बदलवायचे नव्हते तर समाजक्रांतीच करावयाची होती.

नाथसंप्रदायाने मध्यमार्गाचे प्रतिपादन केले असून, इंद्रियदमन, आसनदृढता, बिंदुस्थैर्य व मनाची अंतर्मुखता या गोष्टींवर फार भर दिला आहे.

गोरक्षनाथांचे जन्मस्थान व जन्मकाल निश्चित करणे कठीण आहे. पण शोधग्रंथांचा तुलनात्मक अभ्यास करता लेखिकेला वाटते की, त्यांचा जन्म ११ व्या शतकात उत्तर भारतातच झाला असावा. त्यांनी आपल्या संप्रदायाचा प्रचार व प्रसार प्रथम उत्तर भारतात व नंतर दक्षिण भारतात केला असावा.

या ग्रंथाच्या चौथ्या प्रकरणात नाथ योग्यांच्या गोरक्षप्रणीत वेशासंबंधी व त्यांनी धारण करावयाच्या चिन्हांसंबंधी माहिती आली आहे. या चिन्हांचा सांकेतिक अर्थही तेथे सांगितला आहे. संप्रदायाच्या हल्लीच्या सर्वसाधारण दुरा-वस्थेचे वर्णनही यात आढळते. अपवादात्मक व अत्यंत दुर्मिळ असे या संप्रदायांचे आजचे चांगले योगी सोडल्यास इतरांचे बौद्धिक, आत्मिक व आचारविषयक अधःपतन आणि आर्थिक दुरावस्था पाहून कोणालाही कीवच वाटेल. त्यांच्या उपास्य देवतांच्या व शाखांच्या संख्येत बरीच वाढ झाली आहे. अर्थात तदनुषंगिक मतभिन्नता देखील वाढली आहे.

ग्रंथधन

एका विद्वान संशोधकाने या संप्रदायाच्या ४० ग्रंथांची यादीच प्रसिद्ध केली आहे; तर दुसऱ्या एकाने संप्रदायाच्या २४ योग्यांच्या कविताच एकत्र केल्या आहेत. हे ग्रंथ व या कविता ४०० वर्षांच्या दीर्घ कालावधीत व देशाच्या भिन्न भिन्न भागात लिहिल्या आहेत. त्या काळच्या व त्या भागातील लोक-भाषात ते ग्रंथ व कविता लिहिल्या असल्यामुळे त्यात भाषाभिन्नता फार आढळते.

या पंथाचे परमेश्वरस्वरूप :

शक्तियुक्त शिव हे नाथ संप्रदायिकाचे अंतिम सत्य आहे, ते स्वयंप्रकाशी, स्वसंवेद्य, अनंत,

अविनाशी व व्यक्ताव्यक्त विवर्जित असे आहे. सांप्रदायिकांचे अंतिम .लक्ष्य द्वैताद्वैत-विलक्षण आहे.

त्यांचा साधनामार्ग

या संप्रदायाचे योगी योगमार्गाने आपले अंतिम लक्ष्य गाठण्याचा प्रयत्न करतात. योगमार्ग भारतात प्राचीन कालापासून चालत आलेला असला तरी त्यात गोरक्षांनी जो अल्प बदल केला त्याची माहितीही या ग्रात आहे.

सद्यकालीन शरीरविज्ञानाच्या परिभाषेच्या आश्रयाने समाधी म्हणजे काय हे समजावून देण्याचा प्रयत्न शेवटच्या प्रकरणात केला आहे.

'समालोचन' प्रकरणात मागील प्रकरणातील माहितीचा धावता आढावा घेतला आहे.

या ग्रंथात वैदिक, बौद्ध, जैन, शाक्त, महानुभाव, लिंगायत, वारकरी इ. धर्म, पंथ व संप्रदाय यांची तुलना केलेली आढळते. ती उद्‌बोधक आहे.

ग्रंथाच्या शेवटी दिलेली संदर्भ-ग्रंथांची यादी जिज्ञासू अभ्यासकांना उपयुक्त ठरेल.

भारतीय संस्कृतीच्या घडणीत नाथ संप्रदायाचा वाटा कितीसा आहे, हे या ग्रंथांच्या वाचनाने कळेल.

नाथ संप्रदाय–एक सांस्कृतिक विचार
ले. डॉ. इंदू म. लिंगये,
पृ. १३५, किंमत रु. १०/-
प्रकाशक : अनमोल प्रकाशन, पुणे–२.

⊕ ⊕ ⊕

श्री समर्थ मारूती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र / दिलीप देशपांडे

जेव्हा धर्म बुडायला लागतो आणि अधर्माचे सर्वत्र प्रावल्य वाढते त्यावेळी सज्जनांचे रक्षण आणि धर्माची स्थापना करण्यासाठी प्रत्यक्ष परमेश्वराला अवतार धारण करावा लागतो, असे गीतेमध्ये सांगितलेले आहे. प्राचीन कालापासून अनेक सत्पुरुष या देशात होऊन गेलेत. वेदातील ज्ञान बहुजन समाजापर्यंत पोहचविण्यासाठी संस्कृतची गहन तीरे तोडून मराठी भाषेत ज्ञानदेवांनी 'ज्ञानेश्वरी' ची रचना केली. नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनीसुद्धा वहुजन समाजाला कळेल अशा प्रकारची अभंग-रचना केली. हे सर्व संत वारकरी पंथाचे. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील अत्यंत श्रेष्ठ असा भक्तिपंथ आहे. आत्मतत्त्वाचे मार्गदर्शन करून लोकांमध्ये भक्तिची भावना निर्माण करण्याचे महान कार्य वारकरी पंथातील संतमंडळींनी केलेले आहे. विदर्भातसुद्धा श्रीसंत मारूती महाराजांनी हेच कार्य करण्यासाठी अवतार धारण केला होता, हे त्यांचे चरित्र वाचल्यानंतर कळून येते.

श्री संत मारूती महाराजांचा जन्म बुलडाणा जिल्ह्यातील माकनेर या लहान खेडयात इ. स. १८६६ मध्ये झाला. आई वालंबामाता आणि पिता लक्ष्मणबाबा. दोघेही सात्त्विक, धार्मिक वृत्तीचे. त्यामुळे साहाजिकच महाराजांवर धार्मिक संस्कारांची छाप होती. भक्ती या विषयाचा तर त्यांना छंदच होता. तारुण्यात वैराग्यदशा आली. निरपेक्षवृत्ती हा त्यांचा स्वभाव-गुण. चरित्रकार चरित्रात एके ठिकाणी महाराजांचे स्वभावगुण सांगतात

'संत मारूती बुद्धिमान ।
अंगी प्रसंगावधान ।
कौशल्य, मुत्सद्दीपण ।
स्वभावगुण अंगात ।।'

(अध्याय १६, ओवी २०)

साधुत्वाची बाह्य खूण त्यांचेजवळ आढळत नाही. कीर्तन करणे हे त्यांचे एक वैशिष्ट्य. आदर्श संसार कसा करावा व त्यातून परमार्थ कसा साधावा याचे पाठ ते कीर्तन-प्रवचनांतून देत. त्यांची वाणी अत्यंत रसाळ आणि प्रभावी होती. जगातील अज्ञानी जीवांना ज्ञान देऊन त्यांचा उद्धार करावा ही महाराजांची तळमळ होती.

'जगदोद्धारावांचून । शेप नुरले कर्म जाण ।
चिंता मनी रात्रंदिन । जन सन्मार्गी लावावे ।।'

(अध्याय ४, ओवी ९५)

महाराजांनी लोकांच्या मनात आत्मजागृती केली. पुष्कळ भाविक लोक त्यांना शरण आले व त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. पाखंडी, निंदक लोकांनी त्यांना छळायचासुद्धा प्रयत्न केला. पण महाराजांच्या विद्वत्तेपुढे कोणाचेही काहीच चालले नाही. महाराजांचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांना अगोदरच साक्षात्कार होत होता. ते अंतर्ज्ञानी होते. याची अनेक उदाहरणे प्रस्तुत चरित्रात आढळतात. कीर्तनास उभे राहिल्यावर समोर बसलेल्या श्रोत्यांच्या मनात कोणता विषय आहे हे ओळखून त्यावर ते कीर्तन करीत. वेदांतासारखा गहन विषय अगदी सोप्या भाषेत व्यवहारातील दृष्टांत देऊन ते पटवून देत असत. 'आधी केले मग सांगितले' हे त्यांचे सूत्र होते. त्यांच्या जीवनात आचार आणि विचार यांचे ऐक्य झालेले होते. वेदांत आणि अध्यात्माचे सार भावभक्ति हेच आहे असे आपल्या कीर्तनातून अनेक दृष्टांत देऊन ते निरूपण करीत. त्यामुळे त्यांचे चरित्र व त्यांनी कथन केलेले अध्यात्म एकरूप झालेले आहे. महाराजांचा शिष्यपरिवार बराच मोठा आहे. त्यांची माहिती हे चरित्र वाचतांना दिसून येते. महाराजांचे संतत्व जाणणारे त्यांचे श्रेष्ठ भक्त

श्री. निळकंठ टाकळकर यांचीही माहिती मिळते. शके १८७० मध्ये (इ. स. १९४८) महाराजांची प्राणज्योत मालवली.

महाराजांचा जन्म अद्वैत संप्रदाय प्रस्थापित करण्यासाठीच झाला हे त्यांच्या चरित्रावरून उघड दिसते. ब्रह्यानुभवप्राप्तीसाठी ते ज्या मार्गातून गेले, त्यांनी जे अनुभव घेतले तेच त्यांनी लोकांसमोर मांडले :

'अनुभवजन्य ते ज्ञान।
अंतरी झाले निर्माण।
स्वये देव पाहून।
मग दुजास दाविती ।।' (अ. ९, ओवी १९)

भक्ती ही ज्ञानाची जननी असते. भक्तिमार्ग संत दाखवितात. आणि संतांच्या हृदयात भगवंताचा निवास असतो.

'संत वाण दुकान।
घ्यारे लुटा ब्रह्मज्ञान ।।
तिथे कशाची वाण।
कुणी न पुसे मुक्तीला ।।' (अ. ९ ९५)

असा उपदेश महाराज भक्तांना करतात. लोकांची दिशाभूल करून त्यांना फसविणारे जे पाखंडी साधु संत असतात त्यापासून अलिप्त राहिले पाहिजे असा महाराजांचा उपदेश आहे. जो नराचा नारायण होतो तो श्रीगुरू, असा अध्यात्मशास्त्रातला मानवतावाद ते सांगतात. संसारात राहून मन अलिप्त ठेवावे, ज्याप्रमाणे कमलदल जलात राहून सुद्धा जलापासून अलिप्त असते. प्रत्येकाने स्वावलंबी आणि आत्मसंतुष्ट असायला पाहिजे असेही ते सांगतात.

'स्वप्रारब्धी राहावे। मिळेल ते भक्षावे।
भगवत्चिंतन करावे। मनी संतुष्ट राहुनी ।।'
(अ. ९ २३४)

नवसे-सायास, जादूटोणा, यज्ञयाग इत्यादी सर्व विपरीत धर्माचरणांचे प्रकार असून लोकांनी त्यापासून दूर असावे असे सांगून—

'कली युगी नामस्मरण।
श्रेष्ठ भक्ति साधन।
न लगे श्रम धन।
मन अर्पण करावे ।।' (अ. १०, ओ. ६८)

असे सांगतात. भिक्षा, क्षूद्र देवतांचे पूजन, जातिधर्म, तीर्थयात्रा इत्यादींचा त्यांनी निषेध केला आहे. मोक्ष म्हणजे काय हे सांगताना ते म्हणतात

'मोक्ष म्हणजे मुक्ती।
संसारात विरक्ती।
सुटताच भवासक्ती।
मोक्ष नाव तयास ।।
याच जन्मी मुक्ती।
मिळे मानवाप्रती।
मेल्यावरी मोक्षप्राप्ती।
ही भ्रामक कल्पना ।।,
(अ. १०, ओवी क्रमाक १४७–१४८)

एकूण काय, भक्ती ही सर्वश्रेष्ठ असल्यामुळे 'भक्तीपंथासी जावे' आणि आत्मशुद्धी करून उद्धार करावा असे महाराज सांगतात.

संत मारूती महाराजांचे हे ओवीवद्ध चरित्र असून वीस अध्यायांतून त्याची मांडणी त्यांनी केलेली आहे. चरित्रकाराने केलेली मांडणी आणि त्याची काव्यमय रसाळ शैली ही या चरित्र ग्रंथाची वैशिष्टये. केवळ जन्ममृत्यूची एक कहाणी या ठिकाणी नसून महाराजांनी सांगितलेल्या अध्यात्माची पेरणीसुद्धा मधून मधून केलेली आढळते. स्मृती कायम ठेवणे आणि बोधप्रदता हे या चरित्र लेखनाचे हेतू असून त्यांकडेच चरित्रकाराचे लक्ष होते. चरित्र-लेखनाची आवश्यक साधने जमवून चरित्रकाराने मोठ्या परिश्रमाने हा ग्रंथ सिद्ध केला आहे यात शंका नाही. छपाई, वांधणी आणि मुखपृष्ठ हे ग्रंथाचे वहिरंग आकर्षक आहे. अत्यंत उद्बोधक असे हे चरित्र असून भाविकांनी त्याकडे ध्यान द्यावे.

श्री समर्थ महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र.
संग्राहक—तोताराम संपत भाकरे,
रचनाकार—आनंद माधव देशमुख,
पृष्ठ—३२७, किंमत १२ रुपये.
प्रकाशन श्रीसमर्थ मारूती महाराज ट्रस्ट संस्थान, माकनेर, जि. बुलढाणा.

⊕ ⊕ ⊕

दृश्य/मराठीची एक समस्या : शीघ्रलेखन / श्री. वा. भागवत

'शीघ्रलेखन आणि लघुलेखन' या संज्ञा मराठी शिक्षितांच्या कानांवरून फारच कमी जातात. हे एखाद्या गूढ प्रकारचे लेखन असावे, निदान ते लॅटीन-ग्रीकसारखे अनाकलनीय असावे अशी सामान्य समजूत असल्याने त्यासंबंधी कधी कोणी चौकशी करीत नाही वा उत्सुकताही दाखवीत नाही, म्हणून या दोहोंसंबंधी येथे चार शब्द लिहिण्याचे योजले आहे.

लघुलेखनाचे उद्दिष्ट

आपली सामान्य लिपी बाळबोध. तिची लिहिण्याची **दर मिनिटाला शब्दगती** (द. मि. श.) १५ च्या वर जात नाही. पूर्वी आपले सर्वच जीवनव्यवहार संथ चालत असत. आता आधुनिक शहरी-संस्कृतीत, जीवन अनेकमार्गी, धकाधकीचे नि मुख्यतः गतिमान झाले आहे. रोज असे कित्येक प्रसंग येतात की त्यावेळेला वक्त्यांचा बोलण्याचा वेग आणि आपला लिहिण्याचा वेग सारखा असावा अशी निकड भासते. आपली विधिमंडळे, न्यायालये, प्रशासकीय विभाग, विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, वृत्तपत्रे-नियतकालिकांचा संपादक वर्ग आणि अगणित कार्यालये यांमधून ८० ते १२० च्या **दमिश** ची भाषणे, संभाषणे, संवाद, चर्चा, निवाडे, आदेश, अशा विविध शब्दक्रिया चालू असतात. हे सर्व टिपून घेण्याची क्षमता आपल्या नेहमीच्या लिपीत नाही. हे कार्य क्षमतेने करणे हा लघुलिपीचा उद्देश.

आपण घरीदारी गप्पा मारतो, गुजगोष्टी करतो त्याच मुळी ६० ते १०० दमिशच्या असतात. शाळेतील शिक्षक ५० ते ८० दमिशने शिकवतो तर महाविद्यालयीन प्राध्यापक आपल्या तासिकेत ८० ते १२० च्या दमिश-मर्यादेत सहजतेने फिरत असतो. पीठावरील न्यायाधीशांना निवाडे देतेवेळी असंच वरच्या दमिशमधे बोलावे लागते आणि विधिमंडळातून सतत दहा-दहा पंधरा-पंधरा मिनिटे एकाच दमिशवर बोलणारे फर्डे वक्ते असतात. ही बोलण्याची गती, वक्त्यांची विषयाची तयारी आणि समोरच्या श्रोत्यांची दाद-पात्रता नि बौद्धिक स्तर अशा अनेक गोष्टींवर, अवलंबून असते. पण बोलणे ही एका बाजूने बौद्धिक तर दुसऱ्या बाजूने शारीरिक क्रिया आहे. थोडा वेळ ती पूर्ण दमिशने करता येते पण नंतर थकावट सुरू होते. हे ध्यानात घेऊनच शाळा–कॉलेजातील तासिकांच्या वेळेच्या काही मर्यादा ठरवण्यांत आल्या आहेत. इतर क्षेत्रातही वेळेच्या अशा मर्यादा आपोआप पडतात. त्या बौद्धिक आणि शारीरिक थकावटीमुळेच. एकेका विषयाचा खास अभ्यास करून भाषणाची संपूर्ण टिपणे बरोबर आणणारे वक्ते कधी कधी, तासाच्या वर बोलताना आढळतात. मग थकावटीमुळे वक्त्याच्या बोलण्यात वैचारिक फटी दिसू लागल्या की श्रोते 'योग्य ती दाद देऊन' त्याला भानावर आणतात! याच कारणामुळे २०० च्या पेक्षा अधिक दमिश वर जाणारा वक्ता विरळा. मराठीने अद्याप मोजदाद ठेवलेली नाही. पण इंग्रजीमध्ये २०० ते २५० च्या दमिशवर पाच पाच मिनिटे पर्यंत अस्खलित बोलणारे विधिज्ञ नि पार्लमेंटॅरिअनांची अपवादादाखल उदाहरणे आहेत. हे सर्व ध्यानात घेऊन इंग्रजीने लघुलिपीची मर्यादा ८० ते १६० दमिश अशी ठरवली आहे.

लघुलिपीची आधारभूत तत्त्वे

लघुलिपीत गूढता कोणतीही नसते. तिला आधारभूत असणारी तीन तत्त्वे आहेत. पहिले नावाप्रमाणे तिची अक्षरे लघु म्हणजे फार छोटी असतात. बर्नार्ड शॉने इंग्रजी लिपी सुधारणेसाठी एक ट्रस्ट करून ठेवलेला आहे. त्यात एका ठिकाणी सध्याच्या अक्षरांची लांबलचक गुंडाळी सोडवून ती सुटसुटीत करावी असे म्हटल्याचे सर्वज्ञात आहे. लघुलिपीने हे तत्त्व शतकापूर्वीच कार्यान्वित केले आहे.

अनुक्रमणिका

लघुलिपीचे दुसरे तत्त्व वारंवारतेचे (फ्रीक्वेन्सी) आहे. प्रत्येक भाषेत काही वर्ण, काही शब्द, काही शब्दप्रयोग पुन:पुन्हा येतात. याचा लघुलेखनात फायदा उठवता येतो. जे वर्ण वारंवार येणारे असतील त्यांना सगळयात सोपी अक्षरचिन्हे देण्यात येतात नि वारंवार येणाऱ्या एकेका शब्दाला सूक्ष्मतम चिन्हे देण्यात येतात. या सर्वांचा उद्देश लिहिण्याचा वेळ नि श्रम लघुतम करण्याचा असतो. काही उदाहरणे

सर्व मराठी वर्णांत 'आ' हा स्वर*, आणि 'त', हे व्यंजन वारंवारतेत प्रथम क्रमांकावर आहेत. म्हणून संशोधक यांना सर्वांत सोपी अक्षरचिन्हे देतात. लिपीसाठी या चिन्हांची तरतमता ठरविण्याचेही काही ठोकताळे आहेत. सरळ रेषांपेक्षा गोलसर रेषा लेखणीने नियंत्रित करण्यास सुकर असतात. त्यातही अधोगामीपेक्षा ऊर्ध्वगामी रेषा अधिक तरल असतात. आपण पश्चिमेकडून पूर्वेकडे लिहितो म्हणून ज्या ज्या चिन्हांचा झोक पूर्वेकडे म्हणजे पुढे आहे ती अधिक चपळ असतात. कोनामधे लघुकोन पटकन् लेखणीतून सटकतात; काटकोन आणि विशालकोनाच्या वेळी लेखणी सहस्रांश क्षण स्तंभित होते. एकदा पुढे गेलेली लेखणी मागे आली की 'परागती' होऊन काही शतांश क्षणांचा नाश होतो. इंग्रजीची धावती लिपी गतिमान का याची कारणे या ठोकताळ्यात आहेत.

लघुलिपी शब्दांच्या वारंवारतेला फार जपते. वारंवारतेत "आहे, व, नाही, आणि, या**" हे पहिल्या पांच क्रमांकावरचे शब्द आहेत. अशा शब्दांसाठी संशोधक अनुस्वारासारखे पुसट टिंब, ठळकटिंब पुसट डॅश, ठळक डॅश, द्विटिंब, नुक्ते, स्वल्पविराम, अर्धविरामाएवढी छोटुकली चिन्हे वापरून इकडे क्षणाक्षणाची बचत करतो आणि तिकडे शब्दाशब्दाची वाढ करतो. म्हणूनच तर ती लघुलिपी !

लघुलिपीचे तिसरे तत्त्व भाषिक स्वरूपाचे आहे. भाषेची बोलण्याची आणि लिहिण्याची मोडणी नीट कळली की कित्येक ठोकताळे बसवता येतात. मराठी शब्द लिंगभेद आणि वचनभेद यांच्या सूत्रात गोवलेले असतात. एकेका शब्दाला चपखल गाठ बसली की बाकीच्या शब्दांना ती गाठ मारावी लागत नाही. सामान्यरूपावरून "प्रत्ययांच्या" दिशेचा अंदाज बांधता येतो. 'आणि, व, की' अशी अव्यये सहज ओळखता येतातच पण वाचन चांगले असेल तर मराठीतील कर्ता-क्रियापदांच्या राखीव जागा चटकन् कळून येतात. आपली संयुक्त क्रियापदे, काही जोडाक्षरे, ध्वन्यनुकारी शब्द (धबधबा, खुळखुळा), पौन:पुन्यदर्शक शब्द (भरभर, लागोलाग, पाठोपाठ); विकारी शब्द (मुलगाविलगा, घरदार) आणि रोजच्या वापरात येणारे तत्सम नी तद्भव शब्द (किंबहुना, यच्चयावत्, रात्रंदिवस) हे दिसण्यात शेटजीसारखे अगडबंब असले तरी लघुलिपीत हाताळण्याला फार सोपे असतात. भाषेवर प्रभुत्व असेल त्या प्रमाणात "टिंबाने बिंब(.) आणि सुताने स्वर्ग "(–)" लघुलिपीत हमखास साधता येतो. या तत्त्वाचा अतिरेक होतो तेव्हा मात्र ती लघुलिपी दुर्बोध होत जाते. आपल्या दक्षिणी बंधूंसारखे मराठी माणसाचे प्रभुत्व इंग्रजीवर कधीच नव्हते, म्हणून इंग्रजी लघुलिपी महाराष्ट्रात फोफावली नाही; त्यासाठी अय्यर नि नय्यर बाहेरून यावे लागत असत ! मराठीच्या बाबतीत ती अडचण राहाणार नाही.

आजची मराठी लघुलेखनाची स्थिती काय आहे ? सहा संशोधकांनी आपल्या लघुलिप्या प्रसिद्ध केल्या असून त्यांची १०० ते १२० दमिशची क्षमता असल्याचा त्यांचा दावा आहे आणि ती १६० पर्यंत वाढविण्याची त्यांची ईर्ष्या आहे. इंग्रजीत पंचवीसच्यावर लघुलिप्या असून प्रत्येकाची **दमिश** १५० ते २५० आहे. त्यापैकी पिटमन पद्धती भारतात जास्त करून वापरली जाते आणि आजच्या सर्व मराठी लघुलिप्या त्यावरच आधारित आहेत.

---

* Bhagwat, S. V., Phonemic Frequencies in Marathi and their Relation to Devising a Speed-Script; Poona University and Deccan College Publications in Linguistics, Poona, 1961, p. 138.

Ibid., p. 27.

शीघ्रलिपी म्हणजे काय ?

लघुलिपीला आधारभूत असलेली तीन तत्त्वे वर सांगितली. त्यातील फक्त पहिले तत्त्व शीघ्र-लिपीला लागू आहे. म्हणजे शीघ्रलिपीची अक्षरे लघुलिपीच्या अक्षरासारखी अगदी छोटी असतात. एवढेच त्या दोघीत साम्य आहे. बाकी सर्व बाबतीत शीघ्रलिपी ही सामान्य लिपीसारखी (लाँगहँड) असते. ती कोणतेही शब्द, प्रत्यय किंवा अव्यये गाळीत नाही. लिपी म्हणून तिचा पूर्ण आविष्कार झालेला असतो. लघुलिपित काही काम अनुमान-धक्क्याने चालते. तसे शीघ्रलिपीत नाही. अक्षरे छोटी असतात आणि लिहिण्यात प्रवाहीपणा असतो म्हणून तिची शब्दगती सामान्य लिपीच्या दुप्पट, अडीचपट असते. या तिच्या गुणामुळे तिला शीघ्र लिपी असे म्हणतात. तिची दमिश ६० पर्यंत पोचू शकते.

इंग्रजीत जिला चवथी किंवा धावती लिपी म्हणतात ती पाश्चात्य भाषांचे शीघ्रलिपीचे कार्य करते. पूर्वीच्या आपल्या मोडीला, एका मर्यादित अर्थाने, त्यावेळची शीघ्रलिपी म्हणता येईल. मराठ्यांनी इतिहास गाजवला त्या काळात राज्य-कारभारात आणि इतर दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर सुरू झाला. आजची मुद्रणकला तेव्हा नव्हती. जे 'लेखन' होई ते सर्व हाताने होई. पण हस्तलेखनाला बाळबोध फार क्लिष्ट नि वेळ-काढू आहे; प्रत्येक 'काना, कोपऱ्यावर' ती उभी राहते आणि गमत–डुलत चालते. मराठीच्या त्या उत्कर्षकाळात बाळबोध पांगळी ठरली आणि घोड-दौड करणारी मोडी बाहेर आली आणि मग मोडीने मराठीची सुमारे तीन शतके सेवा केली. पण नंतर येणारे यंत्रयुग तिला मारक ठरले !

१८०५ साली मिरजेला पहिले मराठी पुस्तक लाकडी प्रेसवर छापले गेले नि मुद्रणकलेचा महाराष्ट्रात उदय झाला. त्याकाळी देवघरात बाळबोध आणि बाहेर मोडी अशा मराठीच्या दोन्ही लिपी प्रचलित होत्या. पण मोडीला फाटेफुटे, वळणे ती गुंडाळचा फार. त्यामुळे पश्चिमेकडून आलेल्या मुद्रण यंत्रावर ती बसू शकली नाही. म्हणून बाळबोधची निवड करावी लागली. तेथूनच मोडीची पीछेहाट सुरू झाली आणि पहिल्या महायुद्धानंतर तिचा जवळ जवळ अस्त झाला. आता मोडीतील ते अफाट पेशवे दप्तर वाचणारे लिपिकही दुर्मिळ होत चालले आहेत.

दोघींच्या भिन्न कार्यकक्षा

लघुलिपी आणि शीघ्रलिपी यांच्या कार्य-कक्षा एकमेकीला पूरक पण भिन्न आहेत. लघु-लेखक प्रशिक्षित होऊन १०० ते १२० दमिशने लिहिण्याची पात्रता येण्यास दोन वर्षांचा काळ जातो. असे लघुलेखक मोठमोठ्या कार्यालयातून, विधि-मंडळातून, न्यायालयातून आपल्या प्रशिक्षणाजोगे काम मिळवू शकतात. इतर ठिकाणी एवढ्या शब्दगतीची गरज नसते. तेथे शीघ्रलेखकांवर (५०/६० दमिश) काम भागण्याजोगे असते.

शीघ्रलेखनाचा मुख्य उपयोग वैयक्तिक स्वरूपाचा होतो. ती तीनचार महिन्यात शिकता येते. साहित्यिक, प्राध्यापक, विविज्ञ, राजकारणी, समाज-शास्त्रज्ञ, ग्रामीण अथवा जिल्हा वृत्तपत्रांचा संपादक-वर्ग ज्यांना १००–१५० च्या दमिशची जरूरी नसते पण' व्यवसायामुळे सतत लेखन करावे लागते आणि ज्यांना लघुलेखकावर खर्च करणे आवश्यक नसते व परवडतही नाही, त्या सर्वांना शीघ्रलिपी फार फायदेशीर असते. यापुढे मराठीचा वापर वाढत्या प्रमाणात होत जाईल तसतशी शीघ्र-लेखनाची निकड अधिक भासू लागेल. म्हणून मराठीसाठी झटणाऱ्या संस्थांनी यात लक्ष घालून आपल्या मायबोलीसाठी शीघ्रलिपी संशोधनपूर्वक उत्क्रांत केली पाहिजे. पाश्चात्य भाषांना जे जमले ते आपल्याला मुळीच कठीण असू नये.

शेवटी, लिपीबाबत एका थोर पुरुषाचे स्फोटक उद्गार, त्यात काहींना पुनरुक्ती वाटली तरी, येथे देऊन हा छोटा लेख संपवतो. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी विजयश्री आपल्याकडे खेचून आणल्यावर पंतप्रधान चर्चिल एका निरोपाच्या प्रसंगी नर्मविनोदाने म्हणाले "जपान महायुद्ध हरला याचे कारण त्याची हेंगाडी लिपी !" आता जपानने आपली पारंपरिक लिपी टाकून पाश्चात्य लिपी घेतली आहे आणि आपले 'बडे भाई' चीन तेच करण्याच्या विचारात आहेत हे लक्षात घेतल्यास प्रत्येक ठिकाणी कार्यक्षम लिपी असण्याची निकड सर्वांना पटावी.

⊗ ⊗ ⊗

कविता

निर्धार / विजय लक्ष्मण गुरव

साळसूदपणे जीवलगांनीच दगा दिल्यावर,
दिशाहीन वाळवंटे तुडवीत,
एका ओअॅसीसपाशी आलो
कठोर निर्धारानं.

भटक्या अरबांनीच इथं
रस्त्यांचं दिग्दर्शन केलं
निसर्ग-प्रकोप सहन करीत अखेर
क्षितिजाला भिडविली पहाड-छाती.

तेव्हापासून—
'गुडमॉर्निंग' केल्याखेरीज,
'सूर्याचा' मुखवटा कधी उगवत नाही.
अर्थात्
सरडयांचे रंग पारखून घेता येतील !

आजन्म रोज ज्यांनी / श्रीकृष्ण राऊत

आजन्म रोज ज्यांनी केले नवे तमाशे
माझ्याच तीरडीचे होते फितूर वासे
मैत्री करून जमले बगळे सभोवताली
टिपले हळूच त्यांनी माझ्या खिशात मासे.

दिसलेत मानभावी होते कसाब सारे
भिडले गळयास माझ्या त्यांचे उदार फासे
अभिजात तोतयांनी केला दुपीत वारा
माझ्या मुक्या चुलीच्या देहात रक्त नासे.

काची पडून माझी स्वप्ने कुठे पळाली ?
भीती अशी दुधारी अंगास अंग घासे
फसव्या कटात त्यांनी केली शिकार माझी
सोलून कातडीचे केलेत ढोल, ताशे.

साद्यंत अंध, नकटा, निष्ठूर हा कमिला*
भोळया पतिव्रतेला येथे छिनाल हासे !

*कमिला—कसाईखाना, गुरे कापण्याची जागा.

कुणास ठावूक ? / अनुराधा केने

सगळेच पाण्याचे साठे
एकदा तपासून घ्यायला हवेत असे दिसते
आता कसा विश्वास ठेवावा
की पाण्यासाठी खणले
तर पाणीच लागेल—
आपल्याला हव्या जागी !
अशात
उभे पिकच जळून जायचे एखादे वेळी
अशांतपणे !
आणि पाऊस तरी आपला उरलाय की नाही
कुणास ठाऊक ?
की आता पर्जन्यविरहीत प्रदेशाला
सुरवात झाली असे म्हणायचे !

डोळे : तीन कविता / राजन जी. गवस

(१)

डोळयात डोह—
डोहाच्या पलीकडे अंधाराची वारुळे
वारुळात अस्ताव्यस्त प्रेते
प्रेतांच्या कोषात रक्तमंद वादळे
वादळात संतप्त मोरांचा नाच
मोरपिसांचा जांभळा काळोख
काळोखाला डोळे. .
डोळयात डोह आणि अंधाराची वारुळे !

(२)

खडकांना चेहरे—
चेहऱ्यात पाझरणारे डोळे
डोळे—
आत्महत्येसाठी प्रसिद्ध असलेल्या
विहिरी सारखे !

(३)

झाडांना फांद्या—
फांद्यांना पाने—
पानांना सावरणारे डोळे.
त्यांची हिरव्यागार काळोखात
फकिराप्रमाणे फिरणाऱ्या
काजव्यांसारखी बुबुळे. . ! !

वेशीवरची कविता / राजीव जोशी

वेशीवरून महानगरात शिरताना डोळे अंधारले;
  मन भांबावले, प्रथम.
आता येता जाता वेस मनातच गस्त घालत असते.
वेशीवरून आभाळाचा रंग दिसतो काळा;
दूरचे क्षितिजही घनगर्द.
विस्फारून बुबुळे : काळी काळी दिसतात माणसे,
अन ऐकू येते अंधाराचे क्षीण. .मंद. . .कण्हणे.
गस्तीदाराची वाजतात पाऊले—
रप्. . .रप्. .रप्.
व्हॅलीड पाहून पास माझा
  त्याच्या डोळ्यात पेटतो वणवा.
खूणवत सांगतो—
थांबू नकोस आता.

* * *

वेशीवरली फक्त दीड मिनिटे. .
चहुबाजूंनी गांधार निनादत असतो,
तीव्र व्याकुळतेने अंधार
  येरझाऱ्या मारत असतो.
अन् रस्ते विव्हळत तडफडतात;
अवसरही नसतो डोळ्यात पाणी आणायला.
चुकवायचा असतो क्षणाक्षणाला.
  पाठीवर पडणारा आसूड.
पराजित करण्याची त्याची प्रतिज्ञा.
पर्याय एकच होता
  शरणागती वा हार.
विव्हळणे अटळ आहे रस्त्यासारखे.
कधी पायाने, कधी डोक्याने
धुम्म पळत सुटायचे असते. . .मिळेल त्या वाटेने.

* * *

जिथे तिथे श्वास घेण्यासाठी थांबलो;
तो हसत उभा राहिला घटोत्कचासारखा. .
जिन्यात, लिफ्टमध्ये, कोपऱ्यान् कोपऱ्यात् लोकलच्या,
समुद्रात लाटालाटांवर, अवकाशात चोहीकडे. . .
तरीही माझा पास व्हॅलीड होता.
कॉलर ताठ करून मागितले
  त्याचे आयडेंटिटी कार्ड !
–एक जोरदार आवंढा गिळला
माझा केविलवाणा चेहरा पाहून
  तो हसत हसत म्हणाला—
फिर मिलेंगे ! पुढच्या वेशीवर.

आठवणी / अर्चना सरनाईक

आठवणी एक रित्या मनाचा पोरखेळ
कधी अनाहूत पाहुण्यांसारख्या कंटाळवाण्या;
कधी जखमा उसवत जाणाऱ्या—निष्ठूर;
कधी प्रियकराच्या अनुरागासारख्या हव्याहव्याशा !
आठवणी एक दुबळ्या मनाचे प्रतीक.
कधी अवचित घाव घालणाऱ्या;
कधी दिलासा देणाऱ्या—
समजुतदार !
क्वचित काही आठवणी : एकनिष्ठ पतिव्रतेसारख्या—
आपल्या बरोबर सती येणाऱ्या !

सोबत / माधव भिडे

रात्रीच्या दीर्घ प्रहरी
    साखरझोपेची गुंगी
मादकता मधुस्वप्नांची
    भरभरली अंगी

अितुक्यात आठवण
    चमकली अंतरात
चालायाचा आहे मला
    उरला पथ अनंत

गाढ झोपी दाट सृष्टी
    रजनीच्या दुलअीत
होते उभे तारे लक्ष
    स्तब्ध पहारा करीत

येताचि झुळूक दुरुन
    नादपर्णी सळसळ
सृष्टी बदलता कुशी
    झोपेतली चळवळ

सुरवात प्रवासास
    अंधारी काळचाशार
मार्गी कंटक खळगे
    मी अेकटा मुशाफीर

सोबतीस समोर ती
    चमके शुक्राची चांदणी
अन् आढळ माझ्या हृदयी
    ठेवून तुला साजणी

अनुक्रमणिका

थडग्याची हाक येईपर्यंत / शशिकान्त लोखंडे

घनबरसती रात्र नेत्रांनी आकान्त करणारी
कॅथेड्रीलची धून बर्फाच्या ओघातून
काळजाला जीभ लावणारी.
झाडाच्या गर्भात मातीचे दिवे हिरवेगार
आभाळाला काळोखाचे तोरण आणि
नक्षत्रांचे शाप माझ्या सजल रात्रीला.
दूरवर पसरलेले ओसाडीचे हात
मला बोलावतायत् केव्हापासून,

घन बरसती रात्र झाडांच्या गर्भातून
बर्फाच्या ओघातून पहातोय गोठताना
फुलांची धून तुझ्या उध्वस्त स्वप्नांखाली

रात्र निघून जातेय आरशातून गोळा करीत
ओसपणाच्या प्रतिमा.
(अशावेळी हवीस तू
अफूहून बेधुंद
असावा कैफ मला माझाच)

तुझ्या निर्मळ दिवसांचे ठेवून जा आरसे
त्यात पाहीन नर्सिसगत
तुझे स्वप्न माझ्या ओसाडीतून
थडग्याची हाक येईपर्यंत.

दिशा / ज्योती लांजेवार

बुडालाच जिथे छिद्रे पडलीत तिथे
नौकेची शिडं उडालीत तरी काय ?
पृष्ठभागावर तरंगताना पाणीच जिथे बेईमान व्हावं
तिथे लहरींना म्हणावं तरी काय ?
कधीतरी डुबणारच—
हे अंतिम सत्य जाणले तरी
तिला नावाड्यांनी हाकारावं काय ?
वळणं घेताना सारा भार
टाकला एकट्या सुकाणूवर
पण वादळात सापडल्यावर
किनारेच शोधावेत काय ?
दिशाहीन प्रवासातले दीपस्तंभ गडदले
म्हणून—
हृदयच विझवून टाकावे काय ?

माणूस / विमल भालेराव

जगात सगळ्यात सुंदर आहे माणूस—
त्याला आहे बुद्धी, त्याला आहे रूप अन् वाचाही.
एवढे भरपूर माप नियतीने कुणाच्याही
पदरात घातले नाही.
पण कळत नाही बिच्याऱ्याला आपली 'किंमत'
असते तेथे किंमत नसते, पिकते तेथे विकत नसते
त्यातलाच हा प्रकार.
नसलेले गुण तो आपल्याला चिकटवितो अन्
ठेवतो आपली किंमत भरमसाठ.
घेणाऱ्याला तो भाव परवडत नाही, पण
आपला भाव उतरवायला तो तयार नसतो. कारण—
उथळ पाण्याला खळखळाटच फार !
मुळापासून गणित चुकलेलेच असते त्याचे ! कधीकधी—
असलेले गुणही दिसत नाहीत त्याला
दुसऱ्याने सांगितलेले पटत नाही, स्वतःला कळत नाही
बेरीज कधी होतच नाही, सारख्या वजाबाक्याच
वजाबाक्य.
आणि म्हणून लावतो तो आपली किंमत शून्य
त्यातून जन्मतात गैरसमज
ओढून ताणून तो करतो एक 'गुंतावळा'
त्यात अडकतो आपण अन् अडकवितो लोकांनाही
येथेही त्याचे गणित चुकलेलेच असते.
आपल्यातील गुणदोष कबूल करतात काही लोक
पण हे फारच थोडे, हाताच्या बोटांवर मावणारे !
बाकी सर्व वरच्या सारखेच ! म्हणूनच—
माणसाचे दुःख वाढते
चक्रवाढ व्याजाच्या गतीने अन्
अश्रूही गळतात
पावसाच्या मापाने !

⊕ ⊕ ⊕

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त १–३–१९७९ ते १५–५–१९७९

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ दि. २५–३–७९ ला कार्यकारी मंडळाची सभा केंद्रिय कार्यालयात झाली. साहित्य अकादमीचा फेलो म्हणून श्री. आत्माराम रावजी देशपांडे ह्यांना जो सन्मान मिळाला त्यावद्दल अभिनंदन करण्यात आले. डॉ. मधुकर आष्टीकर हे नागपूर विद्यापीठाच्या कला विद्या शाखेचे अधिष्ठाते व कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून निर्वाचित झाल्यावद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. ३१–१२–७८ ते २४–३–७९ पर्यंतचा झालेल्या जमा-खर्चाची माहिती देण्यात आली. **सावनेर** शाखेला मान्यता देण्यात आली. सौ. सुमतीदेवी धनवटे यांनी मुंबईला जागा मिळविण्यासंबंधी लिहलेल्या दि. १३–३–७९ च्या पत्रासंबंधी माहिती देण्यात आली.

२. आजीव सभासद

२.१ सर्वश्री (१) शेवाळकर, राम बाळकृष्ण, वणी (२) सौ. शेवाळकर, विजया राम, वणी (३) मनोहर, व्यंकटेश रामचंद्र, नागपूर (४) डोके, श्रीराम बाबुराव, शेगांव (५) कुंदा, विजयकर, नागपूर (६) अटल वहादूर सिंह, नागपूर (७) जगनाडे, देवीदास शेषराव, ब्रम्हपुरी (८) साठे, शं. के. डोंबिवली (पूर्व).

३. मराठी साहित्य महामंडळ

३.१ २९–४–७९ ला मुंबई मराठी साहित्य संघ सभा मुंबई येथे झाली. वार्षिक अहवाल सादर करण्यात येऊन यंदाचे मराठी साहित्य महामंडळाचे अधिवेशन बार्शी (जि. सोलापूर) येथे डिसेंबर २५ ते जाने. ५ १९८० च्या दरम्यान घ्यावे असे ठरले. या सभेसाठी वि. सा. संघातर्फे श्री. आ. रा. देशपांडे व श्री. गो. स. देहाडराय हे उपस्थित होते.

४. स्मृतिदिन व जयंती

४.१ दि. २०–३–७९ ला मर्ढेकर स्मृतिदिनानिमित्त प्रा. या. मु. पाठक यांनी 'मी पाहिलेले मर्ढेकर' व श्रीमती मनुताई नातू यानी 'मर्ढेकरांचे सौंदर्य शास्त्र' ह्या विषयांवर विचार व्यक्त केले. संयोजक प्रा. सुरेश देशपांडे होते. मर्ढेकरांचे तैलचित्र वि. सा. संघात लावावे ह्या प्रा. पाठक यांच्या सूचनेला संमति देण्यात आली.

४.२ दि. १०–४–७९ ला ज्ञानकोशकार डॉ. केतकर ह्यांचे पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार डॉ. वसंतराव कुळकर्णी ह्यांचे हस्ते घालण्यात आला. त्या निमित्ताने श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयामध्ये छोटेसे पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यांत आले.

४.३ दि. १४–४–७९ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त त्यांचे फोटोला डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांनी हार घालून त्यांचे कार्याबद्दल गौरवपर उल्लेख केला.

४.४ दि. २८–४–७९ ला शिवजयंती निमित्त शिवाजीच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. दर्शनी भागात रोषनाई करण्यांत आली.

४.५ दि. १–५–७९ ला कै. नाना जोग ह्यांचे पुतळघाला डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांचे हस्ते हार घालण्यात आला.

५. सांस्कृतिक कार्यक्रम

५.१ बेहेरे व्याख्यानमाला–यावर्षी कै. बेहेरे व्याख्यानमाला दि. २४, २५, २६ मार्च, १९७९ गुंफण्यासाठी औरंगाबादचे प्रा. प्रभाकर मांडे याना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी एक व्याख्यान खामगांव व दोन व्याख्याने नागपूर येथे गुंफली. "मराठी लोकसाहित्याचे स्वरूप विश्लेषण" ह्या विषयावर व्याख्याने झाली. त्यांनी तीन दिवस (१) लोक साहित्याच्या अभ्यासाची दिशा (२) लोकगीते, लोककथा गीते, आणि लौकीक गीते (३) लोकवाङमय आणि व्यक्तिनिर्मित ललित वाङमय ह्या विषयांच्या अनुषंगाने माहितीपूर्ण व्याख्याने दिली.

५.२ दि. ६–५–७९ ला कै. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ डॉ. गं. त्र्यं. देशपांडे यांचे हस्ते झाला. श्रीमती इंदुमती शेवडे, सौ. विमलाबाई देशपांडे व प्रा. विजय देशपांडे ह्यानी गौरवपर भाषणे केली. ह्या समारंभाला बरीच मान्यवर मंडळी उपस्थित होती. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर हे होते. ह्या प्रसंगी ग्वाल्हेर येथील अध्यक्षीय भाषणाची टेप वाजविण्यात आली. कै. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या ग्रंथाचे प्रदर्शन ठेवण्यात आले.

६. नाट्य समिती

६.१ घर अंगण अंतर्गत दि. १२–५–७९ ला "अबोली" या नाट्यसंस्थेतर्फे "चित्र" एकांकीका सादर करण्यात आली. दिग्दर्शन श्री. शंभू गणपुले यांनी केले.

७. चित्रकला

७.१ दि. ३ ते ९ मार्च बसोली ग्रूपचा बाल चित्रकार अभय पुराणिक यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यांत आले. उद्घाटन् प्रा. श्री. वसंत परब, चित्रकला महाविद्यालय ह्यांचे हस्ते झाले. प्रदर्शनाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

७.२ दि. २९–३–७९ ला मोरघडे ह्यांच्या तैलचित्रांचे (पोर्ट्रेट) चे प्रदर्शन वि. सा. संघाच्या सहकार्याने घेण्यात आले. श्री. मोरघडे हे सध्या काही विद्यार्थ्यांना पोर्ट्रेट पेंटींग बद्दल शिक्षण देत असतात. ह्याचा वर्ग साधारणपणे प्रत्येक रविवारी सकाळी वि. सा. संघाच्या चित्रकला दालनात चालविण्यांत येतो.

८. परीक्षा समिती

८.१ सहा वर्षाचा — परीक्षार्थी प्रगतीपट

वर्ष	शालेय	महाविद्यालयीन	शासकीय	एकूण	वाढ	केंद्र संख्या
१९७३–७४	६७०	३३७	२३२	१२३९		२४
१९७४–७५	१४१८	७१६	११९	२३३३	१०९४	५०
१९७७–७८	२०४३	४४६	६६	२५५५	२२२	५७
१९७८–७९	१९८९	२१७९	३५	४२०३	१६४८	७६

या संख्येने आजवरच्या प्रगतीत उच्चांक गाठलेला आहे.

उत्पन्न सुमारे रु. १७८००/- खर्च सुमारे रु. १९०००/-.

(१) आगामी परीक्षा :—ऑगस्ट १९७९ च्या शेवटच्या शनिवारी होतील.

(२) आवेदन पत्रे १ जून पासून स्वीकारली जातील.

(३) शासकीय व साहित्य परीक्षांचे वर्ग संघ कार्यालयात सायं. ६ ते ७, १५ जून पासून होतील, तत्पूर्वी प्रवेश घेणे आवश्यक.

९. शाखावृत्त

९.१ **मुर्तिजापूर** :—दि. २१–३–७९ शाखेची सभा होऊन १९७९–८० साठी नवीन कार्यकारीणी निवडण्यात आली. अध्यक्ष– भगवानदास बूब, उपाध्यक्ष–प्रा. गढे, विश्वास हरणे, सरचिटणीस– विनय देशमुख, चिटणीस प्रकाश तायडे, कोषाध्यक्ष– विनायक नवघरे.

९.२ **यवतमाळ** :—दि. १७–३–७९ महाराष्ट्राचे ख्यातनाम शाहीर व कितंनकार श्री. गुलाबराव झाडे व श्री. मनमोहन राठोड यांच्या कितंनाचा कार्यक्रम झाला. ह्या प्रसंगी नागपूर शाखेचे कोषाध्यक्ष श्री. अ. ल. लिमये हे पण हजर होते.

९.३ **लाखनी** :—दि. १०–३–७९ "अंकुर" ह्या हस्तलिखित मासिकाचे प्रकाशन प्रा. भाऊ मांडवकर यांचे हस्ते झाले.

दि. ११–३–७९ "आदिवासी जीवनाचे दर्शन" ह्या विषयावर प्रा. भाऊ मांडवकर यांचे भाषण झाले.

दि. २८–३–७९ स्थानिक लोकांचा "कविसंमेलन" हा कार्यक्रम श्री. प्रल्हादजी पांढारकर यांचे अध्यक्षतेखाली झाला. एकंदर १७ कवींनी भाग घेतला होता. कार्यक्रम फारच उठावदार व आनंद-दायक झाला.

९.४ **नागभीड शाखा** :—दि. ३–४–७९ ला साहित्य क्षेत्रातील मुशाफरी या विषयावर प्रा. भास्कर नंदनवार यांचे भाषण झाले. वि. सा. संघाच्या परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यांत आले.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

अनुक्रमणिका

लेख सूचि

कविता

कथा

ग्रंथ परिक्षणें :

(शेवटचा क्रमांक पृष्ठांकाचा आहे.)

क्रमांक	पुस्तकांचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	मूल्य रुपये
११.	आणखी एक द्रोणाचार्य	उमाकांत ठोमरे	अभिनव प्रकाशन, मुंबई नं. १४	८८	७।-
१२.	प्रतिबिंब	विमल बी. गोडवोले	—,,—	१६८	१५।-
१३.	खलाटी	म. ना. पाटील	—,,—	८८	७।-
१४.	उद्रेक	योगिराज वाघमारे	—,,—	११०	८।-
१५.	सारा जन्म उन्हात	द. स. काकडे	—,,—	१४८	१२।-
१६.	उत्तर रात्र	अनिल किणीकर	श्री शब्द प्रकाशन,१६९१ सदाशिवपेठ, पुणे ३०	६२	८।-
१७.	आपल्या शिमग्याचा सण व त्यातील लोकगीते	रामकृष्ण नारायण केळकर	रामकृष्ण नारायण केळकर प्रेरणा कार्यालय, इ ११५।५ आरगाव/गोवा	३२	२।-
१८.	गुन्हेगारांची कैफियत	सौ. कमलिनी फडके	ह. रा. महाजनी	१०२	१५।-
१९.	श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र	आनंद माधव देशमुख	के. जी. देशमुख रुखमिणी नगर, अमरावती	३२७	१२।-
२०.	मुक्ता	अरविंद गोखले	सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. १७२ मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग, दादर मुंबई	२२८	१६।-
२१.	आद्य महाराष्ट्र सात वाहन काल	रघुनाथ महारुद्र भुसारी	द. प. जोशी कार्यवाह, मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश—हैद्रावाद २७	२२१	२७।-
२२.	रापण	प्रल्हाद अनंत धोंड	मौज प्रकाशन गृह खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४	२६६	३०।-
२३.	आलापिनी	वामन हरी देशपांडे	—,,—	१७६	२२।-
२४.	पंडित आता तरी शहाणे व्हा	श्री. ना. पेंडसे	—,,—	१०६	९।-

अनुक्रमणिका

क्रमांक	पुस्तकांचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	मुल्य रुपये
२५.	यक्षांची देणगी	जयंत नारळीकर	मौज प्रकाशन गृह खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४	२३७	२१।-
२६.	चित्रपट एक कला	विजय दिक्षित	रेणुका प्रकाशन, २१७७ मधली होळी नाशिक	२५९	२४।-
२७.	गजानन महाविजय	ह. वि. दातार	वसंत प्रेस अकोट	१२६	११।-
२८.	श्री ज्ञानदेवांचा मृत्यु	मु. रा. कुळकर्णी	भुवनेश्वरी प्रकाशन, १८८ समर्थ नगर औरंगाबाद	५४	५।-
२९.	हूविल डायग्नोसइट	हरीश वनसोड	अस्तित्व प्रकाशन, वर्मा बिल्डींग, खडकेश्वर, औरंगाबाद	४८	६।-
३०.	सातयुगोस्लाव लघुकथा	गौरी देशपांडे	साहित्य अकादमी, रिजनल ऑफिस क्रासरोड, दादर-मुंबई १४	६२	६।-
३१.	दुष्टचक्र	चिं. त्र्यं. खानोलकर	नीळकंठ प्रकाशन १६४३ सदाशिव पेठे पुणे ३०	८४	१२।-
३२.	बेगम बर्वे	सतीश आळेकर	—,,—	५३	१०।-

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर—१२.
मुद्रक : क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर—१०.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

--विक्रीस तयार असलेली प्रकाशने--

पुस्तके	रु. पैसे
१. कै. हरिभाऊ मेने यांचा संशोधन लेखसंग्रह, भाग २	६-००
२. The Vedasthan or the Ancient Home of the Indo Aryans : ले. कै. डॉ. तु. ज. केदार	६-००
३. प्रयोगक्षम मराठी नाटके : डॉ. मु. श्री. कानडे	३०-००
४. मराठी वर्णोच्चार विकास : डॉ. द. ह. अग्निहोत्री	३२-००
५. लोकसाहित्य संपदा : ना. रा. शेंडे	१२-००
६. केशवसुत वाङ्मय सूची : सौ. उज्वला अयाचित	२-००
७. कै. डॉ. य. खु. देशपांडे : वाङ्मय सूची	२-००
कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध	
१. गोविंदाग्रज यांचा कवी या नात्याने विचार : कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	१-००
२. गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगतः : प्रा. श्री. मा. कुळकर्णी	१-००
३. सुतारीचे नव्हे, एकतारीचे बोल : द. वि. तेंडूलकर	१-००
४. गडकऱ्यांची खरी भूमिका : प्रा. भ. श्री. पंडित	१-००
५. गडकऱ्यांची नाट्यशैली : प्रा. रू. पां. पांजणकर	१-२०
६. गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टी : वसंत वरखेडकर	१-२०
अमराठी भाषिकांना मराठी व्याकरणाचा अभ्यास करण्याकरिता सहज-सोपे पुस्तक	
७. हिन्दी मराठी भाषा प्रवेशिका, द्वितीयावृत्ती : श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	४-००
८. तीन भाषणे : गणेश व्याख्यानमाला १९७७ (प्रथम आवृत्ती) डॉ. र. श. केळकर	४-००

मागणीकरिता संपर्क साधा

सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-१२.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.
मुद्रक : क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर–१०.

अनुक्रमणिका